दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रू. ५.०० । अंक १९ । बुधवार २८ ऑक्टोबर २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

अहिल्यानगर • जळगाव • धुळे • नंदुरबार • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • धाराशिव • लातूर • नांदेड • परभणी • हिंगोली • अमरावती • अकोला • यवतमाळ • बुलढाणा • वाशिम • नागपूर • वर्धा • भंडारा • गोंदिया • चंद्रपूर • गडचिरोली • मुंबई • ठाणे • पालघर • रायगड • रत्नागिरी • सिंधुदुर्ग • पुणे • सातारा • सांगली • कोल्हापूर • सोलापूर • नाशिक

## २०२७ पर्यंत भारताची डिझेल निर्यात वाढणार!



काही महिन्यांपूर्वी डिझेलच्या तुटवड्याचा सामना करणारा भारत आता डिझेलचा प्रमुख निर्यातदार बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. सरकारी तेल कंपन्या रिफायनरींची क्षमता वाढवत असून, २०२७ पर्यंत डिझेल उत्पादन आणि निर्यातीत मोठी वाढ अपेक्षित आहे. केंद्रीय मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी याबाबत माहिती दिली. वाढत्या उत्पादनामुळे देशांतर्गत मागणी पूर्ण करण्यासोबतच अन्य देशांनाही डिझेलचा पुरवठा करणे शक्य होणार आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय ऊर्जा बाजारपेठेत भारताचे स्थान मजबूत होण्यास आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यास मदत होईल.

# विधानपरिषद निवडणुकीत सगळेच गॅसवर!

### नागपूर, पुण्यात भाजपची आघाडी; मराठवाड्यात राष्ट्रवादी, अमरावतीत सरनाईक पुढे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई : महाराष्ट्र विधानपरिषदेच्या तीन पदवीधर आणि दोन शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीच्या मतमोजणीत मंगळवारी रात्रीपर्यंत चुरशीचे चित्र पाहायला मिळाले. पाचही जागांवर महायुती आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांमध्ये अटीतटीची लढत सुरू असून, काही मतदारसंघांतील निकालांकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.**

नागपूर पदवीधर मतदारसंघात भाजपचे सुधाकर कोहळे यांनी आघाडी घेतली असून, काँग्रेसचे विद्यमान आमदार अभिजीत वंजारी यांच्यासमोर आव्हान निर्माण झाले आहे. पुणे पदवीधर मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार गटाच्या हर्षदा देशमुख-जाधव यांनी भाजपच्या डॉ. स्मिता जाधव यांच्याविरोधात आघाडी घेतल्याचे वृत्त आहे.

पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपचे कौस्तुभ गावडे आघाडीवर असून, शिवसेना पुरस्कृत सचिन सानप आणि काँग्रेसचे जयंत आसगावकर यांच्याशी त्यांची लढत झाली. छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचे डॉ. प्रतापसिंह पाटील आघाडीवर असल्याचे वृत्त आहे. अमरावती शिक्षक मतदारसंघात शिवसेनेचे किरण सरनाईक यांनी आघाडी घेतली आहे.

या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही बाजूंनी प्रतिष्ठा पणाला लावली होती. बंडखोरी, उमेदवारीवरून झालेली नाराजी आणि स्थानिक राजकीय समीकरणांमुळे पाचही मतदारसंघांतील लढतींकडे विशेष लक्ष लागले आहे.

### आघाडी घेतलेले उमेदवार



मतदारसंघ- **नागपूर पदवीधर**
आघाडीवरील उमेदवार- **सुधाकर कोहळे**
पक्ष **-भाजप**



मतदारसंघ- **पुणे पदवीधर**
आघाडीवरील उमेदवार- **हर्षदा देशमुख-जाधव**
पक्ष **-राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)**



मतदारसंघ- **छत्रपती संभाजीनगर**
आघाडीवरील उमेदवार- **डॉ. प्रतापसिंह पाटील**
पक्ष **-राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)**



मतदारसंघ- **अमरावती शिक्षक**
आघाडीवरील उमेदवार- **किरण सरनाईक**
पक्ष **-शिवसेना**



मतदारसंघ- **पुणे शिक्षक**
आघाडीवरील उमेदवार- **कौस्तुभ गावडे**
पक्ष **-भाजप**

# कुकडीचे आवर्तन १२ ऐवजी ५ नोव्हेंबरपासून



### उपमुख्यमंत्री पवार व जलसंपदामंत्री विखे पाटील यांच्या बैठकीत निर्णय

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निघोज** : मंगळवार दि. २७ आक्टो. २०२६ पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या मागणीची दखल घेत आमदार काशिनाथ दाते सर यांनी केलेल्या आग्रही पाठपुराव्याला यश आले आहे. कुकडी डाव्या कालव्याचे आवर्तन पूर्वनियोजित १२ नोव्हेंबरऐवजी आता ५ नोव्हेंबर २०२६ रोजी सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे रब्बी हंगामातील पिकांना वेळेत पाणी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत कुकडी प्रकल्पाच्या सन २०२६-२७ च्या पाणी नियोजनासंदर्भात आज, २७ ऑक्टोबर रोजी मुंबई येथील मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. जलसंपदा विभागाचे मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत कुकडी डाव्या कालव्याच्या आवर्तनाबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

संबंधित विभागाकडून यापूर्वी १२ नोव्हेंबर रोजी आवर्तन सोडण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांची गरज आणि रब्बी हंगामातील पिकांची परिस्थिती लक्षात घेता आमदार काशिनाथ दाते सर यांनी आवर्तन लवकर सोडण्याची आग्रही मागणी केली. शेतकऱ्यांच्या अडचणींची वस्तुस्थिती बैठकीत मांडत त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे आवर्तनाची तारीख सात दिवसांनी पुढे आणण्यात यश आले आहे.

नव्या निर्णयानुसार ५ नोव्हेंबरपासून सुरू होणारे हे आवर्तन पुढील ३५ दिवस चालणार असून, ते रब्बी हंगामासाठी असणार आहे. त्यानंतर सोडण्यात येणारी आवर्तने मात्र दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवण्यात येणार असल्याचे बैठकीत निश्चित **(पान ४ वर)**

# शहापूरमध्ये येथे शॉर्टसर्किटमुळे दोनशे एकर ऊस जळून खाक

दिपक खोसे । राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगांव** : शेवगाव तालुक्यातील शहापूर येथे शॉर्टसर्किटमुळे उसाच्या शेताला आग लागुन तोडणीला आलेला दोनशे एकर ऊस भीषण आगीत जळून खाक झाल्याने यामध्ये अनेक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असून, आधीच दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकऱ्यांवर आगीच्या संकटाने दुहेरी घाव घातला आहे.

सविस्तर वृत्त असे की मंगळवारी दुपारी अडीच वाजण्याच्या दरम्यान आत्माराम आहेर यांच्या गट नं ४१/२ ब मधील शेतातील टान्सफार्मर मध्ये शॉर्टसर्किटमुळे आग लागुन आत्माराम आहेर यांच्या उसाच्या शेताबरोबर शेजारील शेतकरी लक्ष्मीकांत अण्णासाहेब आहेर,भरत एकनाथ आहेर,भीमराज काकडे ,आदिनाथ सोंडे,बापू सोंडे ,शिवराज आहेर ,महेश आहेर ,शेषराव आहेर ,बबन आहेर ,शिवाजी आहेर ऋषिकेश आहेर , योगेश आहेर, अंकुश आहेर,सुरेश आहेर, चंद्रकांत आहेर, आबासाहेब आहेर,आमोल आहेर,या शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात ऊसाचे पीक जळून खाक झाले आहे आग लागल्याने धुर जाळ मोठ्या प्रमाणात व वारा मोठ्या



प्रमाणात असल्यामुळे १ तासांमध्ये दीड किलो मीटर पर्यंत आगीने रौद्ररूप धारण केल्याने शेतकऱ्यांचे उसाचे पीक जळुन पुर्णपणे खाक झाले असून यावर्षी दुष्काळाच्या झळा, त्यात आगीचा वणवा!

पावसाच्या अनिश्चिततेमुळे आणि दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आधीच आर्थिक संकटाचा सामना करत असताना पिके जगवण्यासाठी केलेला खर्च, पाण्याची टंचाई आणि कर्जाचा वाढता बोजा यामुळे शेतकरी हतबल झाला आहे. अशातच शहापूर येथे लागलेल्या आगीने उभ्या उसाच्या पिकाची राखरांगोळी केली. **(पान ४ वर)**

# वडारवाडी ग्रामपंचायत कार्यालयात सफाई कामगार महिलेचा खून,प्रियकराला अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : भिंगारजवळील वडारवाडी ग्रामपंचायत कार्यालयात सफाई कामगार महिलेचा डोक्यात लोखंडी हँडलने घाव घालून खून करण्यात आल्याची घटना मंगळवारी (दि. २७) सकाळी आठच्या सुमारास घडली. अनिता देविदास अळकुटे (वय ४२) असे मृत महिलेचे नाव असून, या प्रकरणी तिचा प्रियकर असल्याचे सांगितल्या जाणाऱ्या संतोष नाना धोत्रे (वय ४९) याला भिंगार कॅम्प पोलिसांनी अटक केली आहे.




पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, वडारवाडी ग्रामपंचायतीत अनिता अळकुटे सफाई कामगार म्हणून कार्यरत होती, तर संतोष धोत्रे ग्राम पंचायतीच्या कचरा संकलन करणाऱ्या घंटागाडीवर चालक म्हणून काम करत होता. मंगळवारी सकाळी दोघांमध्ये काही कारणावरून वाद झाला. या वादातून संतोषने ग्रामपंचायत कार्यालयातच पाणीपुरवठ्यासाठी वापरण्यात येणाऱ्या लोखंडी हँडलने अनिताच्या डोक्यावर वार केल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेली अनिता रक्ताच्या थारोळ्यात पडली.

घटनेची माहिती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्यासह भिंगार कॅम्प पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. जखमी अनिताला तातडीने जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले; मात्र रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच तिचा मृत्यू झाला होता. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून संतोष धोत्रे याला ताब्यात घेतले. त्यानंतर त्याला अटक करण्यात आली.

**■ दोघांमध्ये १० वर्षांपासून प्रेमसंबंध होते; मात्र अनिता यांचे दुसऱ्या व्यक्तीशी संबंध असल्याच्या संशयातून हा खून केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. तरी खुनामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या घटनेमुळे वडारवाडी परिसरात खळबळ उडाली असून, पुढील तपास भिंगार कॅम्प पोलीस करीत आहेत.**

# पत्नी व प्रियकराच्या त्रासाला कंटाळून पतीची आत्महत्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मिरजगाव** : पत्नीचे कथित अनैतिक संबंध आणि तिच्या प्रियकराकडुन होणाऱ्या मानसिक त्रासाला कंटाळून मिरजगाव येथील धम्मसागर तुकाराम घोडके (वय ३६) याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना मिरजगाव येथे घडली आहे.

या प्रकरणी मयताची आई विजया तुकाराम घोडके (वय ५२) यांनी शांताराम उर्फ संग्राम बापू घोडके आणि पूजा धम्मसागर घोडके यांच्याविरुद्ध मिरजगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.घटनेनंतर दोन्हीही आरोपी फरार झाले असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.

पोलिसांत दाखल फिर्यादीनुसार, धम्मसागरची पत्नी पूजा हिचे संग्राम घोडके याच्यासोबत गेल्या दीड वर्षापासून कथित संबंध असल्याचा आरोप आहे. पूजा सुमारे वर्षभरापासून संग्राम सोबत जामखेड येथे राहत असल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकारामुळे धम्मसागरला मानसिक त्रास होत असल्याचा दावा त्याच्या आईने केला आहे.

२५ ऑक्टोबर रोजी रात्री नऊच्या सुमारास धम्मसागर मोटारसायकल घेऊन घराबाहेर गेला होता. रात्री साडेनऊच्या सुमारास त्याचा चुलत भाऊ अजय घोडके याने त्याला घरी आणले. धम्मसागर हा डुकरी नदीजवळ मोटारसायकलीसह पडलेला आढळल्याचे अजयने सांगितले.घरी आल्यानंतर धम्मसागरने आईला दिलेल्या माहितीनुसार, संग्राम घोडके आणि पूजा घोडके यांनी डुकरी नदीजवळ त्याला खाली पाडून **(पान ४ वर)**

# दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना दुहेरी दिलासा!

### कर्जमुक्तीची चौथी यादी चर्चेत ■ दुष्काळग्रस्तांना पाच हजारांची अग्रीम मदत



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई** : दुष्काळ, पाणीटंचाई आणि हाताशी आलेले पीक वाया गेल्याने आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने कर्जमुक्ती आणि अग्रीम मदतीच्या निर्णयांना गती दिली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत चौथ्या यादीची घोषणा करण्यात आली असून, ४ लाख १५ हजार शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी चार हजार कोटी रुपयांचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविण्यात आल्याची माहिती आहे. दुसरीकडे, दुष्काळग्रस्त दीड कोटी शेतकऱ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्याच्या निर्णयामुळे दिवाळीपूर्वी आर्थिक आधार मिळण्याची अपेक्षा आहे.

राज्य सरकारने आतापर्यंत १५ लाख ८५ हजार ४९३ शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ दिल्याचे सांगण्यात येत आहे. त्यासाठी १३ हजार २७५ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. योजनेचा सर्वाधिक लाभ मराठवाड्यातील ६ लाख २७ हजार शेतकऱ्यांना मिळाल्याची माहिती आहे. मात्र, अद्याप चार लाख ८२ हजार शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण (केवायसी) बाकी असल्याचे सूत्रांनी सांगितले.

योजनेनुसार, दोन लाख रुपयांपर्यंतच्या पात्र थकीत पीककर्जाला कर्जमुक्ती मिळणार आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांनी कर्जखात्याची स्थिती तपासून आवश्यक प्रमाणीकरण पूर्ण करणे गरजेचे आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्यात येणार आहे. यासाठी सात हजार ५०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. मदतीची रक्कम थकीत कर्जापोटी कापून घेऊ नये, असे स्पष्ट निर्देश बँकांना देण्याची भूमिका सरकारने घेतली आहे. तसेच, आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांकडे वित्तीय कंपन्यांनी वसुलीसाठी तगादा लावल्यास संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याबाबतही कठोर भूमिका घेण्यात आली आहे.

मात्र, कर्जमुक्तीच्या याद्या, केवायसीची प्रक्रिया आणि प्रत्यक्ष मदत खात्यात जमा होण्याचा कालावधी याबाबत शेतकऱ्यांमध्ये अद्याप संभ्रम आहे. त्यामुळे जाहीर घोषणा प्रत्यक्ष मदतीत किती लवकर रूपांतरित होतात, याकडे राज्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

#### दोन लाखांपर्यंतच्या पीककर्जाला कर्जमुक्ती

- **कर्जाचा कालावधी : १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ दरम्यान वितरित झालेले पात्र पीककर्ज.**
- **थकबाकीचा निकष : ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेले पात्र कर्ज.**
- **कर्जमुक्तीची मर्यादा : दोन लाख रुपयांपर्यंत.**
- **अग्रीम मदत : दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपये.**
- **महत्त्वाचे : पात्र शेतकऱ्यांनी कर्जखाते तपासून आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे.**




# साईबाबा संस्थानकडून दुष्काळ निधीस ५ कोटींची मदत

अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : महाराष्ट्र राज्यातील दुष्काळ निवारण कार्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या वतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीस ५ कोटी रुपयांचे आर्थिक योगदान देण्यात आले असून या रकमेचा धनादेश आज साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला.

यावेळी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे आणि जलसंपदा मंत्री गिरीश महाजन उपस्थित होते. राज्यातील अनेक भागात यंदा पावसाने पाठ फिरवली असल्याने दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून शेतकऱ्यांना, जनावरांना आणि पिण्याच्या पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे, या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी आणि दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांना सहकार्य करण्याच्या उद्देशाने संस्थानच्या वतीने हे आर्थिक योगदान देण्यात आले आहे. श्री साईबाबा संस्थान भाविकांना विविध सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून विविध सेवाभावी कार्यातही नेहमीच योगदान देत असते, कोरोना काळात असो, पूरपरिस्थितीत असो किंवा दुष्काळात असो संस्थानने नेहमीच मुख्यमंत्री सहाय्यता निधीला मोठे योगदान दिले असून यावेळी दिलेले हे ५ कोटी रुपयांचे योगदान हे संस्थानच्या सेवाभावी कार्यपरंपरेचे आणि सामाजिक बांधिलकीचे प्रतीक असून या निधीचा उपयोग **(पान ४ वर)**

#### साईबाबा संस्थान च्या निर्णयाचे स्वागत -कैलास बापू कोते

महाराष्ट्रात निर्माण झालेल्या भीषण दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेगावच्या श्री गजानन महाराज संस्थानने मुख्यमंत्री सहायता निधीसाठी १ कोटी ११ लाख रुपयांची मदत दिल्यानंतर, शिर्डीच्या श्री साईबाबा संस्थाननेही भरीव मदत करावी अशी मागणी मी केली होती.

# आभासी लोकप्रियतेचा फुगा!




आजचे जग डिजिटल झाले आहे. हातातील भ्रमणध्वनीच्या पडद्यावर लाखो लोकांपर्यंत पोहोचता येते, काही सेकंदांत एखादी व्यक्ती प्रसिद्ध होते आणि तिच्या प्रत्येक कृतीला हजारो पसंती व शेकडो प्रतिक्रिया मिळतात. या लोकप्रियतेतून अनेकांना आपण समाजाचे नेतृत्व करू शकतो, लोक आपल्याला प्रत्यक्ष जीवनातही तितकाच पाठिंबा देतील, असा समज होतो. मात्र, राजस्थानमधील सरपंचपदाच्या निवडणुकीशी संबंधित एका वृत्ताने या समजुतीला जोरदार धक्का दिला आहे. समाजमाध्यमांवर लाखो अनुयायी असलेल्या ओमप्रकाश बिश्नोई यांना निवडणुकीत अवघी ३३ मते मिळाल्याचे वृत्त समोर आले आहे. आभासी जगातील लोकप्रियता आणि प्रत्यक्ष जगातील स्वीकारार्हता यांत किती मोठे अंतर असू शकते, याची जाणीव करून देणारी ही घटना आहे.

ओमप्रकाश बिश्नोई हे देशी तुपाचे पदार्थ खातानाचे व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसिद्ध झाल्यामुळे चर्चेत आले. त्यांच्या विविध समाजमाध्यम खात्यांवर लाखोंच्या संख्येने अनुयायी असल्याचे सांगितले जाते. मात्र, फलोदी परिसरातील इंद्रों की ढाणी-दोन पंचायतमधून सरपंचपदाची निवडणूक लढविल्यानंतर त्यांना केवळ ३३ मतांवर समाधान मानावे लागल्याचे वृत्त आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी मतदारांना भेटून प्रचार केला, भोजन आणि भंडाऱ्याचे आयोजनही केले. तरीही मतपेटीत अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. त्यांनी व्यसनमुक्तीची भूमिका घेतल्यामुळे मतदारांनी पाठिंबा दिला नसावा, अशी शक्यताही व्यक्त केली. मात्र, त्यांच्या पराभवाचे नेमके कारण मतदारांच्या स्वतंत्र प्रतिक्रियांशिवाय निश्चित करता येणार नाही. निवडणुकीतील हा निकाल मात्र एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करतो, की समाजमाध्यमांवरील लोकप्रियता म्हणजे जनतेचा विश्वास असतो का? तर याचे उत्तर अर्थातच नकारार्थी आहे.

समाजमाध्यमांवरील अनुयायी म्हणजे मतदार नव्हेत. एखाद्या व्यक्तीचा व्हिडिओ मनोरंजक वाटला म्हणून तो

## लाखो अनुयायी, मतपेटीत अवघी ३३ मते; समाजमाध्यमांवरील लोकप्रियता म्हणजे जनाधार नव्हे!

पाहणारा प्रत्येक जण त्या व्यक्तीच्या सामाजिक, राजकीय किंवा वैचारिक भूमिकेशी सहमत असेलच असे नाही. एखाद्या कृतीला पसंती देणे, ती इतरांपर्यंत पोहोचविणे आणि त्या व्यक्तीला प्रत्यक्ष नेतृत्वाची जबाबदारी सोपविणे या तीन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. मनोरंजनासाठी मिळणारा प्रतिसाद आणि सार्वजनिक जीवनात विश्वासार्हता मिळविणे यांमध्ये मूलभूत फरक आहे.

समाजमाध्यमांच्या परिणामांवर झालेल्या संशोधनातूनही या विषयाचे गुंतागुंतीचे स्वरूप समोर येते. अमेरिकेतील प्यू संशोधन केंद्राच्या २०१८ मधील अभ्यासानुसार, ७४ टक्के अमेरिकी नागरिकांना समाजमाध्यमांवरील आशयातून समाजातील महत्त्वाच्या प्रश्नांबाबतच्या एकूण जनभावनेचे अचूक चित्र दिसत नाही, असे वाटते. समाजमाध्यमांवरील आशय संगणकीय प्रणालींद्वारे वापरकर्त्यांच्या आवडी आणि त्यांच्या संभाव्य प्रतिसादानुसार निवडला जातो. त्यामुळे एखादी व्यक्ती वारंवार दिसणे किंवा तिचे व्हिडिओ मोठ्या प्रमाणात प्रसारित होणे म्हणजे समाजातील सर्व घटक तिचे समर्थक आहेत, असा निष्कर्ष काढता येत नाही.

याचा अर्थ समाजमाध्यमांवरील लोकप्रियतेचा प्रत्यक्ष परिणामच होत नाही, असा मात्र नाही. २०१३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका संशोधनात अमेरिकी प्रतिनिधिगृहाच्या निवडणुकांमधील उमेदवारांचा समाजमाध्यमांवरील उल्लेख आणि त्यांच्या मतांच्या प्रमाणात सांख्यिकीय संबंध आढळल्याचे संशोधकांनी नोंदविले. २०२३ मधील अन्य एका संशोधनात अर्जेंटिना, ब्राझील, ब्रिटन आणि अमेरिकेतील निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर समाजमाध्यमांवरील सहभाग आणि निवडणूक निकाल यांचा अभ्यास करण्यात आला. या अभ्यासांतून समाजमाध्यमांचा राजकीय व्यवहाराशी संबंध असू शकतो, हे स्पष्ट होते; मात्र अनुयायांची संख्या म्हणजे मिळणाऱ्या मतांची हमी, असा निष्कर्ष त्यातून निघत नाही.

विशेषतः नव्या पिढीने या वास्तवाचे भान ठेवणे आवश्यक आहे. आजची तरुण पिढी तंत्रज्ञानाशी अधिक जोडलेली आहे. तिच्यासाठी समाजमाध्यमे ही केवळ मनोरंजनाची साधने नसून माहिती, शिक्षण, संवाद, व्यवसाय आणि सामाजिक अभिव्यक्तीची महत्त्वाची माध्यमे आहेत. या माध्यमांमुळे सामान्य व्यक्तीलाही आपले कौशल्य जगासमोर मांडण्याची संधी मिळते. सामाजिक प्रश्नांवर जनजागृती करता येते आणि अन्यायाविरुद्ध व्यापक जनमतही उभे करता येते. त्यामुळे समाजमाध्यमांना नाकारणे चुकीचे ठरेल. प्रश्न आहे तो त्यांच्या प्रभावाचा अर्थ समजून घेण्याचा.

एखाद्या व्यक्तीच्या व्हिडिओला लाखो पसंती मिळाल्या म्हणजे तिचे विचार योग्य आहेत, असे मानणे जितके चुकीचे आहे, तितकेच तिच्या प्रसिद्धीवरून तिच्या चारित्र्याचा किंवा कर्तृत्वाचा निष्कर्ष काढणेही चुकीचे आहे. समाजमाध्यमांवर अनेकदा अतिरंजित, भावनिक किंवा वादग्रस्त आशयाला मोठा प्रतिसाद मिळतो. हा प्रतिसाद नेहमीच माहितीच्या सत्यतेचे किंवा आशयाच्या सामाजिक मूल्याचे प्रमाण नसतो. मनोरंजनासाठी निर्माण झालेली लोकप्रियता आणि सार्वजनिक प्रश्नांची जाण, निर्णयक्षमता, प्रामाणिकपणा व लोकांशी असलेला प्रत्यक्ष संपर्क यांची तुलना करता येत नाही.

संयुक्त राष्ट्रांच्या शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटनेने माध्यम आणि माहिती साक्षरतेवर भर दिला आहे. चुकीची माहिती, दिशाभूल करणारा आशय आणि द्वेषपूर्ण मजकूर ओळखण्यासाठी चिकित्सक विचार करण्याची क्षमता आवश्यक असल्याचे संघटना अधोरेखित करते. तिच्या संकेतस्थळावरील माहितीनुसार, २०२४ मध्ये प्रसिद्ध झालेल्या निष्कर्षांत दोनतृतीयांश डिजिटल आशयनिर्माते माहिती प्रसारित करण्यापूर्वी नियमितपणे तथ्यपडताळणी करत नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे एखादी गोष्ट मोठ्या प्रमाणात प्रसारित झाली म्हणून ती खरी मानण्याऐवजी तिची विश्वासार्हता तपासणे गरजेचे आहे.

लोकशाहीत मतदाराचा निर्णय हा केवळ प्रसिद्धीवर आधारित नसतो. स्थानिक प्रश्नांची जाण, सार्वजनिक कामातील सातत्य, उपलब्धता, सामाजिक संबंध आणि उमेदवाराच्या कामगिरीबद्दल असलेले मत अशा अनेक घटकांचा त्यावर प्रभाव असतो. गावपातळीवरील निवडणुकीत पाणी, रस्ते, स्वच्छता, शेती, स्थानिक विकास आणि नागरिकांच्या दैनंदिन अडचणी यांना विशेष महत्त्व असते. समाजमाध्यमांवरील अनुयायी जगाच्या विविध भागांत असू शकतात; परंतु सरपंचपदासाठी मतदान करणारे मतदार हे संबंधित पंचायत क्षेत्रातील नागरिक असतात. या दोन्ही समूहांचे हितसंबंध आणि अपेक्षा एकसारख्या असतीलच असे नाही.

बिश्नोई यांच्या पराभवावरून त्यांची समाजसेवा निरर्थक ठरते, असाही निष्कर्ष काढता कामा नये. एखाद्या निवडणुकीतील पराभव म्हणजे व्यक्तीचे संपूर्ण सामाजिक योगदान नाकारले गेले, असे नाही. त्याचप्रमाणे, एखाद्याला लाखो अनुयायी आहेत म्हणून तो लोकप्रतिनिधी होण्यासाठी आपोआप पात्र ठरत नाही. समाजसेवा आणि निवडणूक यांचे निकष वेगळे आहेत. निवडणूक लढविणाऱ्याने मतदारांच्या अपेक्षा समजून घेणे आणि त्यांचा विश्वास संपादन करणे आवश्यक असते.

समाजमाध्यमांवरील प्रसिद्धी ही संधी असू शकते; पण ती जनाधाराची हमी नाही. नव्या पिढीने आभासी जगातील प्रतिसादाचा आनंद जरूर घ्यावा; मात्र त्यालाच वास्तव समजण्याची चूक करू नये. पसंतींच्या आकड्यांपेक्षा विचारांचे मूल्य, अनुयायांच्या संख्येपेक्षा नात्यांतील विश्वास आणि प्रसिद्धीपेक्षा प्रत्यक्ष कामाला महत्त्व द्यावे. डिजिटल जग आपल्याला जगाशी जोडते; परंतु आपण समाजात किती खोलवर रुजलेलो आहोत, हे ठरविण्यासाठी प्रत्यक्ष जगातील अनुभव आणि कृतीच महत्त्वाची ठरतात. राजस्थानमधील हा निवडणूक निकाल त्याच वास्तवाची जाणीव करून देतो.

## घरी सोडण्याच्या बहाण्याने रिक्षा चालकाकडून महिलेवर अत्याचार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर,** घरगुती वादातून घराबाहेर पडलेल्या महिलेला घरी सोडण्याचे आश्वासन देत ऑटोरिक्षात बसवले. मात्र, तिला निर्जनस्थळी नेऊन जिवे मारण्याची धमकी देत अत्याचार केल्याची धक्कादायक घटना वैजापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जांबरगावजवळ घडली. पीडित महिलेने प्रसंगावधान राखत आरोपीच्या तावडीतून सुटका करून घेतली आणि चहाच्या टपरीवर जाऊन पोलिसांना माहिती दिली. महिलेच्या तक्रारीवरून अज्ञात ऑटोरिक्षाचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला छत्रपती संभाजीनगर परिसरात पती आणि दोन मुलांसह राहते. सोमवारी (दि. २६) संध्याकाळी घरगुती कारणावरून पतीसोबत वाद झाल्यानंतर ती रागाच्या भरात घराबाहेर पडली. गंगापूरच्या दिशेने जाताना ऑटोरिक्षाने ती कायगाव येथे पोहोचली. तेथील रामेश्वर मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याजवळ ती बराच वेळ बसून होती.

रात्री अकराच्या सुमारास एका तीन आसनी ऑटोरिक्षाचालकाने तिची विचारपूस केली. महिलेने जोगेश्वरीजवळील रांजणगाव येथे सोडण्यास सांगितल्यानंतर चालकाने तिला घरी पोहोचविण्याचे आश्वासन देत रिक्षात बसवले. मात्र, रिक्षा अपेक्षित मार्गाने जात नसल्याचे महिलेच्या लक्षात आले. विचारणा केल्यावर चालकाने हा शॉर्टकट असल्याचे सांगितले.

मंगळवारी पहाटे तीनच्या सुमारास चालकाने रिक्षा निर्जनस्थळी थांबवून महिलेला जिवे मारण्याची धमकी देत तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर तिच्या गळ्यातील सोन्याचे दागिने काढून देण्याची मागणी करत तिचा गळा पकडला. मात्र, महिलेने त्याच्या हाताला हिसका देत तेथून पळ काढला. मुख्य रस्त्यावरील चहाच्या टपरीवर पोहोचून तिने तेथील व्यक्तीला पोलिसांना कळविण्यास सांगितले.

माहिती मिळताच वैजापूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत महिलेला पोलीस ठाण्यात आणले. आरोपीच्या शोधासाठी महिलेने दिलेल्या वर्णनाच्या आधारे तपास सुरू आहे. संबंधित रिक्षा काळ्या रंगाची असून त्यावर पिवळा पट्टा असल्याचे तिने पोलिसांना सांगितले. पुढील तपास वैजापूर पोलीस करीत आहेत.

## संत सावता महाराज मंदिर परिसर विकासासाठी १० लाखांचा निधी : आ. लंघे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा :** तालुक्यातील करजगाव येथील संत सावता महाराज मंदिरासमोरील सभामंडपात काँक्रिटीकरण करून पेव्हिंग ब्लॉक बसविण्यासाठी आमदार स्थानिक विकास निधी योजनेंतर्गत १० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याचे आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी सांगितले.करजगाव येथील संत सावता महाराज मंदिर परिसरातील या विकासकामामुळे भाविकांना धार्मिक कार्यक्रमांसाठी अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. मंदिरासमोरील सभामंडपात काँक्रिटीकरण व पेव्हिंग ब्लॉक बसविल्यामुळे परिसर अधिक सुस्थितीत होऊन ग्रामस्थांची सोय होणार आहे. विकासकामांच्या माध्यमातून जनतेचा विश्वास संपादन करत, गावोगावी विकासाची नवी दिशा निर्माण करण्याचा आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांचा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे. जनतेच्या सेवेला सर्वोच्च प्राधान्य देत नेवासा मतदारसंघाच्या प्रगतीसाठी त्यांचे प्रयत्न सातत्याने सुरू असल्याने आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या या कामाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## खोलीचे कुलूप तोडून कापूस चोरी, अज्ञाता विरोधात गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील गंगापूर येथे शेतातील खोलीचे कुलूप तोडून सुमारे सहा क्विंटल कापूस चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. या चोरीत अंदाजे ४० हजार रुपयांचा कापूस चोरट्याने लंपास केला असून, या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

गंगापूर येथील दिलीप परसराम काळे, वय ६८ वर्षे, हे शेती व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. गंगापूर शिवारात त्यांच्या मालकीची शेती असून, शेतातील पिके ठेवण्यासाठी त्यांनी खोल्या बांधलेल्या आहेत. त्यांच्या शेतात कापसाचे पीक घेतलेले आहे.

शनिवार दि. २४ ऑक्टोबर २०२६ रोजी काळे यांनी मजुरांच्या मदतीने शेतातील कापसाची वेचणी केली. त्यानंतर सायंकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास वेचलेला कापूस शेतातील खोलीत ठेवला होता. मात्र दुसऱ्या दिवशी रविवार दि. २५ ऑक्टोबर रोजी सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास ते शेतातील खोलीजवळ गेले. तेव्हा खोलीच्या दरवाजाचे कुलूप तुटल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

त्यांनी खोलीत जाऊन पाहणी केली असता, तेथे ठेवलेला कापूस गायब असल्याचे आढळून आले. परिसरात कापसाचा शोध घेतला, मात्र तो मिळून आला नाही. त्यानंतर अज्ञात चोरट्याने खोलीचे कुलूप तोडून कापूस चोरून नेल्याची खात्री झाल्याने त्यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

चोरीस गेलेल्या कापसाचे वजन अंदाजे सहा क्विंटल असून, त्याची किंमत सुमारे ४० हजार रुपये आहे. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. ११९५/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३३४(१) अन्वये अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहे.

## अशोक कारखाना तोट्यात गेल्यास अध्यक्ष, संचालकांना जबाबदार धरणार :ॲड. अजित काळे यांचा इशारा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** अशोक सहकारी साखर कारखाना यंदाच्या गळीत हंगामात कमी दिवस चालल्यास उत्पादन खर्च वाढून मागील हंगामापेक्षा अधिक तोटा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कारखान्याचे अध्यक्ष आणि संचालक मंडळाला वैयक्तिकरीत्या जबाबदार धरून नुकसानीची कायदेशीर जबाबदारी निश्चित करावी, असा इशारा शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. अजित काळे यांनी दिला आहे. यासंदर्भात संघटनेच्या वतीने कारखाना व्यवस्थापनाला निवेदन देण्यात आले.

कारखान्याने पूर्ण क्षमतेने गाळप केल्यास सभासद शेतकरी आणि कामगारांचे हित साधले जाईल. मात्र, वाढता तोटा, शेतकऱ्यांवरील अन्याय आणि व्यवस्थापनाबाबत सभासदांमध्ये निर्माण झालेला अविश्वास दूर करण्यासाठी ठोस उपाययोजना आवश्यक असल्याचे काळे यांनी निवेदनात म्हटले आहे.

गळीत हंगाम सुरू करण्यापूर्वी ऊसदर जाहीर करावा, बाहेरील कार्यक्षेत्रातून आणल्या जाणाऱ्या उसासाठी करार करावा आणि बाहेरील कारखान्यांमध्ये वजन करून आणलेल्या वाहनांना अडवू नये, अशी मागणी करण्यात आली आहे. कारखान्याचा वजनकाटा अचूक असल्यास बाहेर वजन करून आणलेल्या वाहनांच्या वजनात तफावत आढळणार नाही, हे व्यवस्थापनाने स्पष्ट करावे, असेही निवेदनात नमूद केले आहे.

कारखान्याच्या वार्षिक अहवालातील उत्पादन खर्च आणि प्रत्यक्ष खर्च यामध्ये तफावत असल्याचा आरोप करत उत्पादन खर्च कमी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच अनेक महिन्यांपासून कामगारांचे वेतन प्रलंबित असल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला आहे.

कारखाना कमी दिवस चालल्यास देखभाल, कर्मचारी व व्यवस्थापन खर्च तसेच कर्जावरील व्याज वाढेल. वीज निर्मिती आणि उपपदार्थांच्या उत्पादनातही घट होऊ शकते. त्यामुळे संभाव्य नुकसानीची जबाबदारी निश्चित करून वसुलीची कारवाई करावी, अशी मागणी काळे यांनी केली. यावेळी साहेबराव चोरमल, प्रा. कार्लस साठे, शिवाजीराजे पटारे, ॲड. प्रशांत कापसे, शरद आसने, संदीप उघडे, सुजित बोडखे, भाऊसाहेब गव्हाणे, खंडेराव सरोदे आदी उपस्थित होते.

## शिलेगावच्या विद्यार्थिनीची थेट इस्रोच्या अंतराळ संशोधन केंद्राला भेट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी,:** ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीने आपल्या गुणवत्तेच्या जोरावर मोठी झेप घेतली आहे. राहुरी तालुक्यातील शिलेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता पाचवीची विद्यार्थिनी रितिका किरण भांड हिची केरळमधील थुंबा येथील डॉ. विक्रम साराभाई अंतराळ केंद्राला भेट देणाऱ्या शैक्षणिक सहलीसाठी जिल्हास्तरावर निवड झाली आहे. तिच्या या यशाबद्दल ग्रामस्थ, ग्रामपंचायत आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला.




ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही गुणवत्ता आणि जिद्दीची कमतरता नसते, हे रितिकाने सिद्ध केले आहे. इस्रोच्या अंतराळ संशोधन केंद्राला भेट देण्याच्या निमित्ताने तिला भारताच्या अंतराळ संशोधनाची आणि वैज्ञानिक प्रगतीची माहिती प्रत्यक्ष जाणून घेण्याची संधी मिळणार आहे. ही सहल तिच्या ज्ञानात भर घालणारी आणि भविष्यात विज्ञान क्षेत्रात वाटचाल करण्यासाठी प्रेरणा देणारी ठरणार आहे.

रितिकाच्या यशामुळे शिलेगावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून, तिच्या कुटुंबीयांसह संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण आहे. सत्कार सोहळ्याला डॉ. पांडुरंग म्हसे, सोसायटीचे चेअरमन सागर म्हसे, मेजर नारायण तागड, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुभाष म्हसे, सर्जेराव म्हसे, विजय कातोरे, सुभाष भांड, अनिल भांड, शरद म्हसे, बाबासाहेब देवरे, किरण भांड आणि संदीप म्हसे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

जिल्हा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, गटशिक्षणाधिकारी जयश्री कार्ले, शिक्षण विस्तार अधिकारी सुनील लोंढे व इंदुमती देवरे आणि केंद्र समन्वयक कुंदन साळवे यांनी रितिकाचे अभिनंदन केले. तिच्या यशात योगदान देणारे मुख्याध्यापक योगेश देशमुख, प्रतिभा लोंढे, स्मिता आरगडे, नूरजर पठाण आणि संभाजी सोनवणे यांचेही कौतुक होत आहे. यावेळी मुख्याध्यापक योगेश देशमुख यांचाही सन्मान करण्यात आला.

## भरडधान्य प्रक्रिया उद्योगासाठी संशोधनाची गरज : डॉ. विलास खर्चे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** हवामानातील बदल आणि शेती निविष्ठांच्या वाढत्या किमतींमुळे उत्पादनवाढीला मर्यादा येत आहेत. अशा परिस्थितीत शेतमालावर प्रक्रिया करून मूल्यवर्धन केल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू शकते. भरडधान्यांपासून विविध प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करण्यासाठी शास्त्रीय अभ्यास आणि संशोधनाची गरज असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी केले.

महात्मा फुले यांच्या द्विवार्षिक जन्मशताब्दीनिमित्त आणि जागतिक भरडधान्य अभियानाच्या अनुषंगाने महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी आणि कृषी विभागाच्या आत्मा यंत्रणेच्या संयुक्त विद्यमाने भरडधान्य प्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत आयोजित या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. खर्चे अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांनी महाराष्ट्रातील भरडधान्याखालील ६० टक्के क्षेत्र पश्चिम महाराष्ट्रात असल्याचे सांगितले. भरडधान्यांपासून विविध पदार्थ तयार करताना वैविध्य राखल्यास बाजारपेठेतील मागणी वाढू शकते, असे त्यांनी नमूद केले. शेतकऱ्यांच्या समस्या आणि गरजा समजून घेऊन त्यानुसार संशोधनाला दिशा देण्यासाठी शेतकरी-उद्योजक-शास्त्रज्ञ मंच उपयुक्त ठरेल, असेही कुलगुरूंनी सांगितले.

## नेवासा फाटा येथे अत्याधुनिक ट्रॉमा केअर सेंटर उभारा !

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा :** छत्रपती संभाजीनगर-पुणे महामार्ग आणि संगमनेर-बीड या महत्त्वाच्या मार्गांवरील अपघातग्रस्तांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी नेवासा फाटा येथे अत्याधुनिक ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याची मागणी ॲड. सादिक शिलेदार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आरोग्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. नेवासा फाटा हे महत्त्वाचे वाहतूक केंद्र असून, या परिसरातून दररोज मोठ्या प्रमाणात वाहनांची ये-जा सुरू असते. या मार्गांवर अपघात झाल्यास गंभीर जखमींना तातडीने उपचार मिळणे आवश्यक आहे. मात्र, वेळेत उपचार उपलब्ध न झाल्यास रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे या परिसरात सुसज्ज आपत्कालीन आरोग्य सुविधा असणे गरजेचे असल्याचे शिलेदार यांनी निवेदनात नमूद केले आहे. प्रस्तावित ट्रॉमा केअर सेंटरमध्ये २४ तास कार्यरत अतिदक्षता विभाग, आपत्कालीन शस्त्रक्रियांसाठी स्वतंत्र कक्ष, अत्याधुनिक सीटी स्कॅन व एमआरआय सुविधा, तज्ज्ञ डॉक्टर आणि प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचारी उपलब्ध करून द्यावेत. तसेच आपत्कालीन रुग्णवाहिका आणि तातडीच्या उपचारांची सक्षम व्यवस्था उभारावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. रस्ते विकासाबरोबरच अपघातग्रस्तांचे प्राण वाचविण्यासाठी सक्षम आरोग्य यंत्रणा उभारणेही तितकेच महत्त्वाचे आहे. हा प्रश्न केवळ नेवासा तालुक्यापुरता मर्यादित नसून, या मार्गांवरून प्रवास करणाऱ्या प्रत्येक नागरिकाच्या सुरक्षिततेशी संबंधित आहे.

## दुर्गादेवी तरुण मंडळाच्या भंडारा कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद





**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** शहरातील दुर्गादेवी मंदिर प्रांगणात दुर्गादेवी तरुण मंडळाच्या वतीने पौर्णिमेच्या निमित्ताने सोमवारी दि. २६ ऑक्टोबर रोजी आयोजित भंडारा कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हजारो भाविकांनी भंडारा प्रसादाचा लाभ घेतला. नवरात्र उत्सवाची सांगता म्हणून भंडारा कार्यक्रम करण्याची परंपरा दुर्गादेवी तरुण मंडळाने जपली आहे.

यावेळी झालेल्या नवरात्र उत्सव सांगता भंडारा कार्यक्रम प्रसंगी सायंकाळी जगदंबा ज्वेलर्सचे प्रमुख विकास डहाळे व अनिता डहाळे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. पुरोहित निखिलगुरू जोशी यांनी आरतीचे पौरोहित्य केले तर संबळ वादक कलावंत सौरभ दुधे यांनी केलेल्या संबळाच्या निनादाने परिसर भक्तिमय झाला.

दुर्गादेवी नवरात्रोत्सव मंडळाच्या वतीने भंडारा महाप्रसाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हजारो भाविकांनी महाप्रसाद भंडाऱ्याचा लाभ घेतला.

भंडारा कार्यक्रमाच्या निमित्त मंदिरावर भव्य रोषणाई करण्यात आली. भंडारा कार्यक्रमात योगदान देणाऱ्यांचा दुर्गादेवी मंडळाचे अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी दुर्गादेवी तरुण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी विशेष प्रयत्न केले.

## ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सैनिकी शिक्षणातून देशसेवेची संधी

### प्रवरेचे योगदान अभिमानास्पद : डॉ. महेश खर्डे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** पारंपरिक शिक्षणाबरोबरच सैनिकी शिक्षणाच्या माध्यमातून प्रवरेने शिक्षण क्षेत्रात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. आज सैनिक स्कूलमधून शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी देशसेवेत कार्यरत आहेत, ही अभिमानाची बाब आहे. पद्मविभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या दूरदृष्टीतून उभे राहिलेले हे सैनिक स्कूल ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सैनिकी शिक्षणातून देशसेवेची प्रेरणा देणारे महत्त्वपूर्ण केंद्र ठरले आहे, असे प्रतिपादन लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सैनिक स्कूलचे कॅम्पस संचालक डॉ. महेश खर्डे यांनी केले.




सैनिक स्कूलच्या २९ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी कर्नल सुभाष घोडगिरे, प्राचार्य राजेश माघाडे यांच्यासह शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना डॉ. महेश खर्डे म्हणाले की, प्रवरेने ग्रामीण भागात शिक्षण क्षेत्रात अग्रस्थान मिळविले आहे. जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील आणि संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवरेतील विविध उपक्रम विद्यार्थी-केंद्रित ठरत आहेत.

सैनिक स्कूलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच विविध क्रीडा प्रकारांत प्रावीण्य मिळविण्याची आणि देशसेवेसाठी स्वतः ला घडविण्याची संधी मिळत आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याबरोबरच त्यांच्यात शिस्त, आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी विद्यालयाचे प्रयत्न महत्त्वपूर्ण आहेत. प्रवरेच्याशैक्षणिककार्यामुळे संस्थेचे नाव जागतिक स्तरावर पोहोचले असून, सैनिक स्कूलचे अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत, असेही त्यांनी नमूद केले. वर्धापन दिनाचे औचित्य साधून विविध स्पर्धा आणि कलाप्रकारांत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे व्यवस्थापन सहशिक्षक केतन तेलोरे यांनी केले, तर सहशिक्षक ज्ञानेश्वर पाठक यांनी आभार मानले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# नगर जिल्ह्यातील तिसरे बालविवाहमुक्त गाव देडगाव

## आ. विठ्ठलराव लंघे यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा : तालुक्यातील श्री बालाजी देवस्थान यात्रा महोत्सवाचे औचित्य साधून देडगावने सामाजिक क्षेत्रात मोठा टप्पा गाठला आहे.अहिल्यानगर जिल्ह्यातील तिसरे 'बालविवाहमुक्त गाव' होण्याचा बहुमान देडगावने मिळवला आहे. नगर तालुक्यातील रुईछत्तीसी आणि पारनेर तालुक्यातील करंदी नंतर आता नेवासा तालुक्यातील देडगाव या यादीत सामील झाले आहे.**




सोमवार,दि.२६ ऑक्टोबर रोजी श्री बालाजी स्मार्ट केअर हॉस्पिटल, भक्तनिवास येथे स्नेहालय संचलित केअरिंग फ्रेंड्स हॉस्पिटल, उडान प्रकल्प, स्नेहाधार टीम, श्री बालाजी स्मार्ट केअर हॉस्पिटल आणि श्री बालाजी मंदिर देवस्थान ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य मोफत महिला आरोग्य तपासणी शिबिर आणि बालविवाहमुक्त गाव प्रमाणपत्र प्रदान सोहळा उत्साहात पार पडला.

नेवासा मतदार संघाचे आमदार विठ्ठलराव लंघे – पाटील यांच्या हस्ते देडगावला बालविवाहमुक्त गावाचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी सरपंच चंद्रकांत मुंगसे, देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष भाऊसाहेब मुंगसे, उपाध्यक्ष सुभाष चोपडा, सचिव ज्ञानदेव कदम यांच्यासह ट्रस्टचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी आमदार लंघे – पाटील यांनी स्नेहालयच्या कार्याचे कौतुक करत, बालविवाह रोखणे आणि महिला आरोग्याबाबत जनजागृती हे ग्रामीण भागासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

या महिला आरोग्य तपासणी शिबिरात स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ.अंशू मुळे, आयुर्वेदाचार्य डॉ. मानसी कांबळे, डॉ. मनीषा जव्हारे, डॉ. रेश्मा बाफना, डॉ. संदीप लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांची तपासणी करण्यात आली. रक्तदाब, रक्तातील साखर, हिमोग्लोबिन, रक्तगट, डोळे तपासणी तसेच औषध वाटप करण्यात आले. महिला आरोग्य, स्तनपानाचे महत्त्व आणि कर्करोग जनजागृतीवर विशेष संवाद सत्र घेण्यात आले.

स्नेहालयचे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली आणि जि.प. सीईओ आनंद भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली उडान प्रकल्पांतर्गत जिल्ह्यातील १३२७ ग्रामपंचायतींनी बालविवाहमुक्त ठराव केला असून ५३ गावे प्रमाणपत्राच्या अंतिम टप्प्यात आहेत.

२०२७ पर्यंत संपूर्ण जिल्हा बालविवाहमुक्त करण्याचे उद्दिष्ट आहे.बालविवाहाची माहिती मिळाल्यास १०९८, ११२ किंवा स्नेहालय उडान हेल्पलाइन ९०११०२६४९५ वर संपर्क साधण्याचे आवाहन उडान प्रकल्प व्यवस्थापक प्रवीण कदम यांनी केले आहे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर.जे. कोमल भद्रे यांनी केले तर आभार वैशाली चोपडा यांनी मानले.

## द•ख•ल

### सुदीप हासे यांना संगणक अभियांत्रिकीमध्ये पीएच.डी



**संगमनेर :** युवा उद्योग समूहाचे संचालक सुदीप किसन हासे यांनी इंदूर येथील ओरिएंटल विद्यापीठातून संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विषयातील पीएच.डी. पदवी संपादन केली. त्यांच्या यशाबद्दल शैक्षणिक, औद्योगिक आणि सामाजिक क्षेत्रांतून अभिनंदन होत आहे. हासे यांनी 'डिझाइन अँड नालिसिस ऑफ क्लाऊड डिप्लॉयड इंटेलिजंट नालिसिस ऑफ रिअल टाइम ट्विटर डेटा' या विषयावर संशोधन केले. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, डीप लर्निंग आणि क्लाऊड कम्प्युटिंग या आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रांवर त्यांनी लक्ष केंद्रित केले. संशोधनकाळात त्यांनी स्कोपस निर्देशित नियतकालिकांमध्ये चार संशोधन लेख, तीन परिषदांमध्ये शोधनिबंध तसेच एक पुस्तक आणि पुस्तकातील एक प्रकरण प्रकाशित केले. त्यांनी माहिती–तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनीत काम केल्यानंतर अमृतवाहिनी संस्थेत आठ वर्षे प्राध्यापक म्हणून सेवा बजावली. या संशोधनासाठी त्यांना डॉ. मेघा सिंग यांच्यासह विद्यापीठातील मार्गदर्शकांचे सहकार्य लाभले.

### ऑल महाराष्ट्र फेअर प्राईस शॉप किपर्स फेडरेशन जिल्हा प्रसिद्धी प्रमुखपदी छतवाणी



**श्रीरामपूर :** अहिल्यानगर जिल्हा स्वस्त धान्य व रॉकेल परवानाधारक असोशिएशन सलग्न ऑल महाराष्ट्र फेअर प्राईस शॉप किपर्स फेडरेशन पुणे जिल्हा स्वस्त धान्य व रॉकेल परवानाधारक असोशिएशनच्या जिल्हा प्रसिध्दी प्रमुखपदी मंगेश छतवाणी यांची निवड करण्यात आली आहे. संघटनेतील त्यांच्या कार्याची दखल घेऊन मंगेश छतवाणी यांची तीन वर्षासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना जिल्हा प्रमुख सतीश हिरडे, मिनाताई कळकुंबे यांनी निवडीचे पत्र दिले. यावेळी कोपरगांव तालुका अध्यक्ष उत्तमराव चरमल, नगर तालुकाध्यक्ष विश्वासराव जाधव, पाथर्डी तालुकाध्यक्ष शिवाजीराव मोहिते, शेवगाव तालुकाध्यक्ष पोपटराव पाखरे, पारनेर तालुकाध्यक्ष खंडू भुकन, नेवासा तालुकाध्यक्ष मच्छिंद्र पवार आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

### टाकळीभान येथील गावातील विजेचे हायमॅक्स बंद ; ग्रामपंचायतचे दुर्लक्ष

**टाकळीभान :** श्रीरामपूरच्या पूर्व भागामध्ये लोकसंख्येच्या दृष्टीने सर्वात मोठे गाव असलेले टाकळीभान गावातील वार्ड वाईज बहुतांशी विजेचे हाय मॅक्स व स्ट्रीट लाईट बंद आहेत. त्यामुळे गावामध्ये अंधाराचे साम्राज्य रात्रीच्या वेळी राहत असून चोरट्यांना अंधाराचा फायदा होऊन चोऱ्यांमध्ये वाढ होत आहे, तसेच वाड्या रस्त्यावरील स्ट्रीट लाईट हायमॅक्स बंद असल्याने बिबट्याची भीती जाणवत आहे. जवळच या वर्षातील मोठा सण दिवाळी येऊन ठेपल्याने ग्रामपंचायतचे गावातील विजेच्या प्रश्नाकडे याकडे दुर्लक्ष होत असून ग्रामपंचायत ने गावातील सर्व हाय मॅक्स, स्ट्रीट लाईट चालू करावे. हाय मॅक्स स्ट्रीट लाईट गावातील बंद असून दिवाबत्तीचे बिल काढण्याचे काम मात्र सुरू असल्याची माहिती मिळत आहे. तरी या कामी ग्रामपंचायत प्रशासनाने दिवाळी सणा अगोदर लक्ष घालून गावातील सर्व हाय मॅक्स स्ट्रीट लाईट चालू करावी अशी मागणी ग्राम. सदस्य लता भाऊसाहेब पटारे, व सदस्य अशोक कचे यांनी केली आहे.

# थोरात कारखान्याकडून अपघातात चार मृत सभासदांच्या वारसांना आर्थिक मदत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**संगमनेर :** सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या वतीने अपघातात मृत्यू झालेल्या सभासदांच्या चार वारसांना प्रत्येकी दोन लाख रुपयांच्या विम्याची रक्कम देण्यात आली. राज्याचे माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते कारखान्याच्या नवीन प्रशासकीय इमारतीत धनादेशांचे वितरण करण्यात आले.

कारखान्याने सभासदांचा प्रत्येकी दोन लाख रुपयांचा विमा उतरविला आहे. या योजनेअंतर्गत आंबी खालसा येथील कै. सुखदेव नामदेव गाडेकर, राजापूर येथील माधव हासे आणि वडगाव पान येथील मनाजी रेवजी थोरात यांच्या वारसांना धनादेश प्रदान करण्यात आले. चौथ्या मृत सभासदाच्या वारसालाही या वेळी मदत देण्यात आली.

याप्रसंगी कारखान्याचे उपाध्यक्ष पांडुरंग पाटील घुले, नाना शहाजी दिघे यांच्यासह विविध मान्यवर आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी घालून दिलेल्या आदर्शांनुसार कारखाना आणि अमृत उद्योग समूहातील सहकारी संस्थांची वाटचाल सुरू आहे. बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याने शेतकरी, सभासद, ऊस उत्पादक आणि कामगारांचे हित जपण्याला प्राधान्य दिले आहे. ऊसाला चांगला भाव देण्यासोबतच सभासदांच्या कुटुंबीयांच्या अडचणीच्या काळात मदतीचा हात देण्याची भूमिका कारखान्याने कायम ठेवली आहे.

कारखाना परिवाराने आर्थिक मदतीबरोबरच आत्मीयता आणि जिव्हाळ्याचे नाते जपले आहे. कारखाना नेहमीच आमच्या पाठीशी उभा राहिला, अशी भावना संबंधित हासे, थोरात आणि गाडेकर कुटुंबीयांनी व्यक्त केली. सभासदांच्या कुटुंबांना आधार देणाऱ्या या उपक्रमाचे परिसरातून स्वागत होत आहे.

# अवैध धंदे आणि वाढत्या गुंडगिरीमुळे पुणतांबेकर भयभीत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**पुणतांबा :** राहाता तालुक्यातील पुणतांबा गावात अवैध धंदे आणि वाढत्या गुंडगिरीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मटका, जुगार, अवैध मद्यविक्री आणि गोदावरी नदीपात्रातील बेकायदा वाळू उपसा यांसारख्या प्रकारांना आळा घालण्यात यावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. परिस्थिती अशीच राहिल्यास गाव सोडण्याची वेळ येईल, अशी भीती काही ग्रामस्थ आणि व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

गावात खुलेआम मटका सुरू असल्याचे, तसेच देशी–विदेशी आणि हातभट्टीच्या दारूची विक्री होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. विविध ठिकाणी जुगाराचे अड्डे सुरू असल्याचेही आरोप आहेत. गोदावरी नदीपात्रातून १९९० च्या दशकापासून बेकायदा वाळू उपसा सुरू असल्याचा दावा ग्रामस्थांकडून केला जात आहे. या अवैध व्यवसायांतून स्थानिक पातळीवर टोळ्या निर्माण झाल्या असून, वर्चस्वाच्या संघर्षातून वारंवार मारामाऱ्या होत असल्याचे सांगण्यात येते.

तीन दिवसांपूर्वी विसर्जन मिरवणुकीतील वादातून दोन कुटुंबांत तुंबळ हाणामारी झाली. या घटनेत कोयता, तलवार, लोखंडी रॉड, दांडके आणि चाकू यांसारख्या हत्यारांचा वापर झाल्याचे, तसेच काही वाहने जाळण्यात आल्याचे पोलिसांच्या अहवालात नमूद असल्याचे सांगितले जाते. या घटनेमुळे गावातील कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

पुणतांबा येथे पोलिसांचे दूरक्षेत्र असूनही अवैध धंदे सुरू असल्याबद्दल ग्रामस्थांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. पोलिस आणि महसूल प्रशासनाने या प्रकारांकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. सुमारे २५ वर्षांपूर्वी पुणतांबा पोलीस ठाण्यावर आलेल्या मोर्चादरम्यान गोळीबाराची घटना घडली होती. त्या पार्श्वभूमीवर पुन्हा अशा परिस्थितीची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी प्रशासनाने वेळीच कठोर पावले उचलावीत, अवैध धंदे बंद करावेत आणि गुंडगिरीचा बिमोड करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# जननी' मराठी चित्रपटाचा नागपुरात दिमाखात मुहूर्त



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** सामाजिक आशय, प्रेमभावना आणि मनोरंजनाची सांगड घालणाऱ्या 'जननी' या आगामी मराठी चित्रपटाचा मुहूर्त सोहळा नागपूर येथे कोजागिरी पौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर उत्साहात पार पडला. अभिनेत्री श्री राधिका ऊर्फ मंगला ठक यांनी या चित्रपटाच्या माध्यमातून निर्मिती क्षेत्रात पदार्पण केले आहे. सोहळ्याला विदर्भातील अनेक कलाकारांची उपस्थिती लाभली.हिंगणघाट ही कर्मभूमी असलेल्या मंगला ठक यांनी सामाजिक कार्यासोबतच अभिनय, साहित्यलेखन, कथालेखन आणि दिग्दर्शन क्षेत्रातही आपली ओळख निर्माण केली आहे. चित्रपटसृष्टीत त्या 'श्री राधिका' या नावाने परिचित आहेत. त्यांनी विविध हिंदी व मराठी मालिका, चित्रपट आणि वेबमालिकांमध्ये काम केले असून, 'पाठभर जखमा' हे पुस्तकही लिहिले आहे. 'ब्लॅक लेडी फिल्म्स' या निर्मिती संस्थेच्या माध्यमातून त्यांनी विविध कलाकृतींची निर्मिती केली आहे. 'जननी'ची कथा श्री राधिका यांनी लिहिली असून, सामाजिक जाणिवांसोबत रोमँटिक प्रसंग आणि मनोरंजनाचा समावेश चित्रपटात असणार आहे. विविध भाषिक पार्श्वभूमीच्या कलाकारांना या चित्रपटातून संधी मिळणार आहे. ज्येष्ठ दिग्दर्शक पितांबर काळे चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहेत. मुहूर्त सोहळ्यात कलाकारांनी दिलेल्या प्रतिसादाबद्दल राधिका यांनी आनंद व्यक्त केला. कलाकारांचे सहकार्य आणि प्रोत्साहन यामुळे चित्रपटाच्या पुढील प्रवासासाठी नवी ऊर्जा मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

# महायुतीने मल्लिकार्जुन खरगे यांच्या प्रतीकात्मक प्रतिमेला मारली जोडे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**संगमनेर :** काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्य सभेतील विरोधी पक्ष नेते मल्लिका अर्जुन खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी केलेल्या आक्षेपार्ह विधानाच्या निषेधार्थ महायुतीच्या अधिकाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेत संगमनेर बसस्थानक परिसरात महायुतीच्या वतीने खरगे यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत त्यांच्या प्रतिकात्मक प्रतिमा पायदळी तुडवून जाहीर निषेध करत आंदोलन केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केलेल्या विधानामुळे महायुतीच्या कार्यकर्त्यांत संतापाची भावना निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर भाजप, शिवसेना आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय) यांच्यासह महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकत्र येत बसस्थानक परिसरात जोरदार घोषणाबाजी करत जाहीर निषेध केला या आंदोलनात आदिशक्ती फाउंडेशनच्या अध्यक्षा तथा आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ, भाजपच्या शहराध्यक्ष पायल ताजणे, उपाध्यक्ष ज्योती भोर, तालुकाध्यक्ष गुलाब भोसले शिवसेना शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी, उपजिल्हा प्रमुख रमेश काळे, युवा सेनेचे उपजिल्हाप्रमुख सौरभ देशमुख, सुशील शेवाळे, माजी नगरसेवक ज्ञानेश्वर कर्पे, शिरीष मुळे, आर पी आय चे शहराध्यक्ष कैलास कासार यांच्यासह भाजप, शिवसेना आणि महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

> देशामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून माणसाला माणूस जोडून महायुतीचा भगवा पुढे नेण्याचे काम सुरु आहे. परंतु काँग्रेसवाले चांगल्या चाललेल्या कामामध्ये खोडा घालण्याचे काम करत आहे याच काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विषयी अक्षेपार्य विधान करणाऱ्यांचा आमदार अमोल खताळ आणि महायुतीच्या वतीने जाहीर निषेध करण्यात येत आहे.
>
> **नीलम खताळ**

# श्रीक्षेत्र देवगड येथे आज स्वामी अवधेशानंदगिरी महाराजांचे आगमन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**नेवासा :** तालुक्यातील श्री गुरुदेव दत्त पीठ, श्रीक्षेत्र देवगड येथे बुधवार, दि. २८ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता श्री पंच दशनाम जूना आखाड्याचे आचार्य महामंडलेश्वर पूज्य स्वामी अवधेशानंदगिरीजी महाराज यांचे आगमन होणार आहे. यानिमित्त दर्शन, स्वागत व प्रवचन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

श्रीक्षेत्र देवगड येथे आगमनानंतर स्वामी अवधेशानंदगिरी महाराज भगवान दत्तात्रय तसेच श्री समर्थ सद्गुरू किसनगिरीबाबांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेणार आहेत. यावेळी परमपूज्य गुरुवर्य भास्करगिरी महाराज आणि स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या हस्ते त्यांचे संतपूजन करून स्वागत करण्यात येणार आहे. त्यानंतर स्वामीजींचे प्रबोधनात्मक प्रवचन होणार आहे.

अध्यात्मिक व सामाजिक कार्य: वेदांत व उपनिषदांचे गाढे अभ्यासक असलेले स्वामीजी 'प्रभू प्रेमी संघ'चे संस्थापक आहेत. त्यांनी पर्यावरण रक्षण (गंगा स्वच्छता, वृक्षारोपण), शिक्षण, आरोग्य आणि व्यसनमुक्ती या क्षेत्रांत उभे केलेले कार्य अथांग आहे.साहित्य संपदा: त्यांनी 'विचार क्रांती', 'यौगिक चेतना' यांसारख्या विविध ग्रंथांचे लेखन केले असून त्यांच्या प्रवचनांचा लाभ जगभरातील लाखो भाविक घेतात. या दर्शन व प्रवचन सोहळ्याचा भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांनी केले आहे.

# राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेत प्रवरा पब्लिक स्कूलचा डंका

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**लोणी :** कोल्हापूर येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय फुटबॉल स्पर्धेत लोकनेते पद्मभूषण डॉक्टर बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरानगर येथील प्रवरा पब्लिक स्कुलच्या १४ वर्षांखालील मुलांच्या संघाने उपविजेतेपद पटकावत घवघवीत यश संपादन केले. या स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर शाळेचे खेळाडू मोहित चौधरी आणि रोशन पवार यांची महाराष्ट्राच्या संघात निवड झाली अशी माहिती प्राचार्य डॉ.बी.बी.अंबाडे यांनी दिली.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडा परिषद आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांच्या वतीने कोल्हापूर येथील पोलो मैदानावर या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

प्रवरा पब्लिक स्कूलच्या संघाने स्पर्धेत दमदार सुरुवात केली. पहिल्या सामन्यात नागपूर विभागाच्या संघाचा ४–० गोलफरकाने पराभव केला, तर उपांत्य फेरीत लातूर विभागाच्या संघाला २–० गोलफरकाने नमवत अंतिम फेरीत प्रवेश केला.

अंतिम सामन्यात कोल्हापूर विभागाच्या संघाने प्रवरा पब्लिक स्कूलसमोर कडवे आव्हान उभे केले. दोन्ही संघांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. अखेर पेनल्टी शूटआऊटमध्ये कोल्हापूर विभागाने ४–२ अशी बाजी मारल्याने प्रवरा पब्लिक स्कूलला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

या स्पर्धेत जयवर्धन माने देशमुख, जतीन गायकवाड, ओमकार कांमडी, मोहित चौधरी आणि रोशन पवार यांच्यासह संघातील सर्व खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन केले. त्यापैकी मोहित चौधरी आणि रोशन पवार यांची महाराष्ट्र संघात निवड झाल्याने शाळेच्या यशात मानाचा तुरा खोवला गेला आहे. खेळाडूना प्राचार्य डॉ. बी. बी. अंबाडे, मुख्याध्यापिका एम. एस. जगधने आणि प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका एस. आर. रत्नपारखी शाळेचे क्रीडा संचालक अफजल पटेल, योगिता तनपुरे, क्रीडा शिक्षक दीपक जाधव आणि फुटबॉल प्रशिक्षक अतुल डे यांचे मार्गदर्शन लाभले.


## जाहिर नोटीस

तमाम लोकांना या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमचे अशिल अशोक शिवाजीराव शिंदे, रा. पिंपरखेडा, ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर यांनी दिलेल्या माहितीवरुन व दाखविलेल्या कागदपत्रावरुन जाहिर नोटीस देण्यात येते की, मौजे प्रवरासंगम, ता. नेवासा जि. अहिल्यानगर येथील गट नं. ५६/१/ब क्षेत्र ०० हे ८२ आर, आकार ०२ रु. ६२ पै. यापैकी सुनिल साहेबराव शिंदे यांच्या मालकीची ०० हे ४१ आर व त्याच गटातील संजय ज्ञानदेव नजन यांच्या मालकीचे ०० हे ४० आर असे एकुण ०० हे ८१ आर क्षेत्र विक्री करावयाची असून सदर क्षेत्राची चर्तुसिमा पुर्वेस :– पवार यांची मिळकत, दक्षिणेस :– गटापैकी शेळके यांची जमिन, पश्चिमेस :– कोहक यांची जमिन, उत्तरेस :– कोहक यांची जमिन अशी चर्तुसिमापुर्वक मिळकत असून सदरची मिळकत ही अनुक्रमे सुनिल साहेबराव शिंदे व संजय ज्ञानदेव नजन यांच्या नावावर व त्यांच्या मालकीची व कब्जेवहिवाटीत असून आमचे अशिल व त्यांच्यामध्ये जमिनीच्या प्रचलित बाजारभावाप्रमाणे सौदा होवून विक्री करण्याचे ठरलेले आहे. सदर जमिन मालकांनी वरील जमिन निर्वेध व र्निजोखमी व निष्कर्जी आहे. तसेच सदर जमिनीचे लीगल टायटल व पझेशन त्यांचे आहे याबाबत त्यांनी आमचे अशिल यांना विश्वास, हमी व भरोसा दिलेला आहे. सदर मिळकतीविषयी कोणत्याही व्यक्तीचा वरील मिळकतीबाबत काही कायदेशीर मालकी कब्जेवहिवाट, तसेच काही अधिकार असल्यास तसेच सदर मिळकतीवर कोणत्याही व्यक्तीचे बक्षिसपत्र, गहाणपत्र, लिन डिड, लिज डीड, साठेखत, शर्तखरेदीखत, मृत्यूपत्र इत्यादी हक्क व अधिकार असल्यास, तसेच कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचे, सहकारी बँकेचे, सोसायटी अथवा पतसंस्था किंवा कोणत्याही वित्तीय संस्थेचे तसेच हिंदु वारसा कायद्याप्रमाणे वारसा हक्क, पोटगी हक्क, तसेच इतर कोणतेही हक्क व अधिकार असल्यास त्याबाबत संबंधित इसम अथवा संस्थेने त्याबाबतची सर्व कागदपत्रे व पुराव्यानिशी आठ दिवसाच्या आत कार्यालयात येवुन तशी खात्री पटवुन द्यावी. अन्यथा कोणत्याही संस्थेचे अगर व्यक्तीची हरकत नाही असे समजुन आमचे अशिल हे वर नमुद मिळकतीचा व्यवहार करुन घेतील व त्यानंतर कोणत्याही व्यक्तीची अथवा संस्थेची तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. मग त्याचे होणारे परिणामाची जबाबदारी आमचे अशिलावर राहणार नाही. ही जाहिर नोटीस दिली असे. नेवासा

सही/–

**दिनांक :– २७/१०/२०२६** (शिक्का)

**ॲड.डि.आर. धिर्डे**
नेवासा कोर्ट, मो. ८८३०३३१६४२

## जाहीर नोटीस

ने.ता. ४/१२/२०२६

**नेवासा येथील मे. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग १ यांचे न्यायालयात फौजदारी चौकशी अर्ज नंबर २२३/२०२६**

बिन ८
ॲड. ओ.जी. मोटे
दिनांक :– २६/१०/२०२६
मोबा नं. ९९७५३२१६५१

**अर्जदार :– विठ्ठल महादेव चव्हाण वय ६६, धंदा शेती रा. बऱ्हाणपुर ता. नेवासा जि.अ.नगर**

**सा.वाले :– ग्रामसेवक / ग्रामपंचायत अधिकारी बऱ्हाणपुर ता. नेवासा जि.अ.नगर**

ज्याअर्थी नेवासा न्यायालयात फौजदारी चौकशी अर्ज नंबर २२३/२०२३ अर्जदार विठ्ठल महादेव चव्हाण रा.बऱ्हाणपुर ता.नेवासा जि.अनगर यांनी जन्म/मृत्यु कायदा १९६९ कलम १३ अन्वये अर्जदाराची मयत आजी जाईबाई राधाजी चव्हाण ही दि. १५/०५/१९५० रोजी मौजे बऱ्हाणपुर ता. नेवासा घरी मयत झालेली आहे. अशी मृत्युची नोंद होवून मृत्युचा दाखला मिळण्यासाठी सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जदार यांनी केलेल्या अर्जावर कोणाची हरकत असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून दिनांक ४/१२/२०२६ रोजी किंवा ३० पर्यंत स्वतः किंवा वकिलामार्फत हजर होवून हरकती करावयात. योग्य मुदतीत कुणीही हरकत या न्यायालयात न दाखविल्यास सदर कोर्ट अर्जदाराचे हक्काबद्दल लगेच पुरावा घेवून त्यांचे मृत्याचा तारखेचा हक्क सिद्ध झाल्यास मे. कोर्ट अर्जदाराचे हक्कात आदेश करील. नेवासा

**दिनांक :– २६/१०/२०२६** (शिक्का)

सही/–
**तयार करणार**

**आदेशावरून**
सही/–
**सहा. अधीक्षक**
**न्यायदंडाअधिकारी प्रथम वर्ग**
**नेवासा**

# पान १ वरुन

## कुकडीचे आवर्तन १२ ऐवजी ५ नोव्हेंबरपासून

करण्यात आले. यावेळी आमदार दाते सरांसह इतर मान्यवरांनी कुकडी लाभक्षेत्रातील केटीवेअर भरून देण्याच्या केलेल्या आग्रही मागणीवर मंत्री विखे पाटील यांनी सकारात्मकता दर्शवत अधिकाऱ्यांना तशा प्रकारच्या सूचना दिल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी पवार, जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील साहेब, माजी मंत्री दिलीपराव वळसे पाटील, आमदार काशिनाथ दाते सर, आमदार विक्रम पाचपुते, आमदार माऊली आबा कटके, आमदार शरद दादा सोनवणे, कुकडी सिंचन मंडलाच्या अधीक्षक अभियंता अलका अहिरराव, कार्यकारी संचालक कृष्णा खोरे चोपडे, कुकडी पाटबंधारे विभाग क्रमांक १ नारायणगावचे कार्यकारी अभियंता नान्नोर, कार्यकारी अभियंता घोरपडे आदी मान्यवर उपस्थित होते. दुष्काळी परिस्थिती, पाण्याची वाढती गरज आणि रब्बी हंगामातील पिकांचे नियोजन या पार्श्वभूमीवर आवर्तन वेळेत सुरू होणे शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरणार आहे.

## साईबाबा संस्थानकडून दुष्काळ निधीस ५ कोटींची मदत

दुष्काळग्रस्त भागात पाणी पुरवठा, चारा छावण्या तसेच शेतकऱ्यांना मदत अशा विविध उपाययोजनांसाठी करण्यात येणार आहे, त्यामुळे साई भक्तांमध्ये आणि अहिल्यानगर जिल्ह्यात समाधान व्यक्त होत असून साईबाबांच्या दानाचा पैसा हा समाजाच्या संकट काळात कामी येतो हीच खरी साई सेवा असल्याची भावना भक्त व्यक्त करत आहेत. शेतकरी हाच खरा साईभक्त असून संकटाच्या काळात संस्थानने बळीराजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे, अशी भूमिका आपण मांडली होती. या आव्हानाला सकारात्मक प्रतिसाद देत श्री साईबाबा संस्थानने दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी ५ कोटी रुपयांचा निधी जाहीर केला याबद्दल मी ना. राधाकृष्ण विखे व साई संस्थान चे आभार मानतो संस्थानने तातडीने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला या मदतीमुळे दुष्काळग्रस्त भागाला मोठा दिलासा मिळणार आहे.

## शहापूरमध्ये येथे शॉर्टसर्किटमुळे दोनशे एकर ऊस जळून खाक

जळीत झालेल्या शेतकऱ्यांच्या ऊसाचा प्रशासनातील महसूल विभाग, कृषी विभाग आणि महावितरणच्या अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घ्यावी. घटनास्थळाची पाहणी करून नुकसानीचे पंचनामे करावेत, आगीचे नेमके कारण निश्चित करावे आणि बाधित शेतकऱ्यांना नियमानुसार आर्थिक मदत व नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी होत आहे.ऊसाचे जळीत झालेल्या शेतकऱ्यांनी केली आहे.दुष्काळ आणि आगीच्या दुहेरी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आता केवळ आश्वासनांची नव्हे, तर प्रत्यक्ष मदतीची गरज आहे. प्रशासनाने तातडीने कार्यवाही करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा द्यावा.ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना व वृध्देश्वर सहकारी साखर कारखान्याच्या अग्निशामक गाड्यांना पाचारण करण्यात आले होते परंतु आग मोठ्या प्रमाणात असल्यामुळे विझविणे शक्य झाले नाही.

## पत्नी व प्रियकराच्या त्रासाला कंटाळून पतीची आत्महत्या

लाथाबुक्क्यांनी मारहाण केली, असा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. घरी आल्यानंतर धम्मसागर स्वयंपाकाच्या खोलीत गेला आणि त्याने दरवाजा आतून बंद केला. रात्री साडेअकराच्या सुमारास आवाज देऊनही त्याने प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे कुटुंबीयांनी शेजारी व परिचितांच्या मदतीने दरवाजा तोडला. त्यावेळी धम्मसागर गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. त्याला खाली उतरवून तातडीने मिरजगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. मात्र, वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी त्याला उपचारापूर्वीच मृत घोषित केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेप्रकरणी विजया घोडके यांनी २६ ऑक्टोबर रोजी पोलिसांत फिर्याद दाखल केली. संग्राम घोडके आणि पूजा घोडके यांच्या कथित वर्तनामुळे मानसिक त्रास झाल्याने तसेच डुकरी नदीजवळ झालेल्या कथित मारहाणीच्या पार्श्वभूमीवर मुलाने आत्महत्या केल्याचा आरोप त्यांनी केला आहे.या प्रकरणातील आरोपांची सत्यता तपासातून स्पष्ट होणार असून, पोलिसांच्या अधिकृत तपासातून पुढील बाबी समोर येतील. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय झंजाड करीत आहेत.

# "झाले बहु, होतिल बहु, आहेतहि बहु, परंतु यासम हा"

## जिल्हा परिषदेच्या नेवासा पीएमश्री उर्दू शाळेतील महिला शिक्षिकांचा संदेश

**शफीक बागवान। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** "झाले बहु, होतिल बहु, आहेतहि बहु, परंतु यासम हा" असे म्हटले तर मुळीच वावगे ठरणार नाही. मराठीत असलेली ही म्हण आजही अजरामर आहे. जिल्हा परिषदेच्या नेवासा पी एम श्री उर्दू शाळेतील महिला शिक्षिकांचा हा प्रवास उल्लेखनीय असा ठरला आहे. शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येकांसाठी हा संदेश मानला जाईल. भूतकाळात असे अनेकजण होऊन गेले. भविष्यातही असे अनेकजण होतील. वर्तमानकाळातही असे बरेचजण आहेत. परंतु यांच्यासारखा दुसरा कोणीही नाही. अगदी तंतोतंत या उर्दू शाळेने हे दाखवून दिले आहे. एकही पुरुष शिक्षक नसताना सातही महिलांनी या पीएमश्री शाळेचा अल्पावधीत कायापालट करीत राज्यभरातील उर्दू शिक्षकांना मोठा ट्रिट दिला आहे. एकही पुरुष शिक्षक नसलेली ही शाळा, त्यात मुख्याध्यापक पदही मंजूर नाही. पीएमश्री मध्ये निवड झालेल्या जिल्हा परिषदेच्या नेवासा येथील उर्दू शाळेतील महिला शिक्षकांनी शाळेचा नावलौकिक वाढवीत जिल्हा परिषदेसह राज्यभरातील शिक्षण प्रेमींना प्रेरणा दिली आहे. शाळेतील महिला शिक्षिकांचा आदर्श जोपासावा, अशा प्रकारचे काम करून या महिला शिक्षिकांनी शिक्षणाची उंची वाढवली आहे. जिल्ह्यासह राज्यभर जिल्हा परिषदेच्या शाळांना घरघर लागली असताना या उर्दू शाळेने विद्यार्थी संख्या जास्त असूनही प्रत्येक क्षेत्रात नावलौकिक मिळविला आहे. प्रसिद्धीपासून दूर असलेल्या या सर्व महिला शिक्षिकां वर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शाळा खोल्या बाहेर लावलेले विद्यार्थ्यांचे फोटो, शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण झालेले विद्यार्थी व निवड झालेले विद्यार्थी यांचे फलक पाहून प्रत्येकाच्या मनात उर्दू शाळेविषयी आदर निर्माण होईल अशा प्रकारची टापटीपही या महिला शिक्षिकांनी या शाळेत जोपासली आहे. शाळेची परसबाग, वृक्षारोपण व वृक्षसंगोपनाचे कार्य हेवा वाटावा असे आहे. शाळेतील सुसज्ज संगणक कक्ष आणि विज्ञान प्रयोगशाळा पाहिल्यानंतर त्या महिला शिक्षिकांच्या कष्टाला शैक्षणिक क्षेत्रातील प्रत्येक जण सलाम करीत आहे. शाळेच्या मुख्याध्यापिका फरहाना शेख, रिझवाना पठाण, गौसिया शेख, वाजेदा शेख, हसीना शेख, नुजहत शेख, नाझिया शेख, आसमा शेख यांच्या दूरदृष्टीतून आणि अफाट कष्टातून शाळेचा चेहरा मोहरा बदलला आहे.




**जिल्हा परिषदेच्या नेवासा येथील उर्दू शाळेतील या महिला शिक्षिका भगिनींनी आपल्या जिद्दीतून वेगवेगळे शैक्षणिक प्रयोग राबवित शाळेला सन्मान मिळवून दिला आहे. याशिवाय जिल्हा परिषद भेंडा उर्दू शाळेला 'उत्कृष्ट शाळा पुरस्कारा' मिळवून देणाऱ्या शकील खान, तौसीफ सय्यद व अनिसा शेख अशा सर्व शिक्षकांना धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच आहे.**

**इकबाल काकर**
**जिल्हाध्यक्ष,**
**अखिल महाराष्ट्र**
**उर्दू शिक्षक संघटना , श्रीरामपूर.**

# गंगापूर उपजिल्हा रुग्णालयाच्यावतीने बालकांना जंतनाशक औषधांचे वाटप



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : उपजिल्हा रुग्णालय गंगापूर येथे दि २७ ऑक्टोबर वार मंगळवार रोजी राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त गंगापूर येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या वतीने बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने जंतनाशक औषधांचे वाटप करण्यात आले. बालकांमधील पोटातील जंतांचा प्रादुर्भाव कमी करणे, त्यांचे पोषण सुधारणे तसेच शारीरिक व बौद्धिक विकासाला चालना देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या वेळी जिल्हा रुग्णालयाचे आरएमओ डॉ. प्रशांत बडे, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुधाकर मुंडे, रुग्ण कल्याण समितीचे सदस्य अतुल रासकर, डॉ. सूर्यवंशी, डॉ. राठोड, सिस्टर कुलकर्णी, वाघ सिस्टर, धुमाळ सिस्टर, साबळे, अतुल भोसले यांच्यासह रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. डॉ. प्रशांत बडे यांनी बालकांच्या आरोग्याचे महत्त्व अधोरेखित केले. राष्ट्रीय जंतनाशक दिनाच्या माध्यमातून बालकांना जंतांच्या प्रादुर्भावापासून सुरक्षित ठेवणे, त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे आणि आरोग्य विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पात्र बालकांना जंतनाशक औषधोपचार देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. या उपक्रमाच्या माध्यमातून जंतनाशक औषधोपचारासोबतच स्वच्छतेच्या सवयी, स्वच्छ पाणी, संतुलित आहार आणि बालकांच्या आरोग्याची नियमित काळजी घेण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. जंतनाशक औषधांचा वापर आरोग्य विभागाच्या सूचनांनुसार आणि पात्रतेनुसार करण्याचे आवाहनही करण्यात आले.

# व्यसनमुक्त युवा घडविण्यासाठी सात्रळ महाविद्यालयाचा पुढाकार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर,** व्यसनमुक्त युवक, सुदृढ समाज आणि विकसित भारताच्या निर्मितीसाठी सात्रळ येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात 'नशामुक्त युवा, विकसित भारत' अभियान उत्साहात राबविण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या पुढाकारातून आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीची शपथ घेतली. तसेच विविध क्रीडा स्पर्धा आणि ग्रामस्वच्छता मोहिमेत सहभागी होत सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला.



लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या या महाविद्यालयात युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, माय भारत आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या माध्यमातून अभियानाचे आयोजन करण्यात आले. प्रभारी प्राचार्य डॉ. सोपान शिंगोटे अध्यक्षस्थानी होते. यावेळी ग्रामस्थ अनाप साहेब, गागरे साहेब, डुकरे पाटील यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी आणि ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमात युवकांनी व्यसनांपासून दूर राहून निरोगी जीवनशैली स्वीकारावी आणि राष्ट्राच्या विकासात योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले. उपस्थितांनी व्यसनमुक्त समाजनिर्मितीची सामूहिक शपथ घेतली.

विद्यार्थ्यांसाठी लंगडी, रस्सीखेच, धावणे, व्हॉलीबॉल आणि संगीत खुर्ची अशा स्पर्धा घेण्यात आल्या. या माध्यमातून शारीरिक तंदुरुस्ती, संघभावना, नेतृत्वगुण आणि खिलाडूवृत्तीला प्रोत्साहन देण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी ग्रामस्वच्छता मोहिमेत श्रमदान केले. स्वच्छ परिसर, निरोगी जीवन आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून देत सार्वजनिक स्वच्छतेची जबाबदारी प्रत्येकाने स्वीकारावी, असा संदेश देण्यात आला. अभियानाच्या यशस्वितेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. संदीप राजभोज यांनी परिश्रम घेतले. डॉ. भाऊसाहेब नवले, डॉ. एकनाथ निर्मळ, डॉ. अमित वाघमारे, डॉ. गंगाराम वडितके आणि डॉ. विजय कडनोर यांनी सहकार्य केले. विद्यार्थी, प्राध्यापक आणि ग्रामस्थांच्या सहभागामुळे अभियान यशस्वी झाले.

# निधनवार्ता

## सुनिता चेमटे



**सोनई** - नगर तालुक्यातील वडगाव गुप्ता येथील सुनिता गोकुळ चेमटे (वय ५१) यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या अचानक निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.गोकुळ रखमाजी चेमटे यांच्या पत्नी व बाळासाहेब गोकुळ चेमटे, रोहिणी हरीभाऊ घोरपडे, प्राची सुनिल कोकाटे यांच्या आई तर रामदास लक्ष्मण भिगारदिवे यांच्या बहिण होत्या.

## राम कोळपकर



**वडाळा महादेव** : श्रीरामपूर येथील राम विष्णू कोळपकर (८२ वय) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांनी एसटी महामंडळ विभागात अनेक वर्षे कर्तव्य बजावले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे, जावई असा मोठा परिवार आहे. येथील सामाजिक कार्यकर्ते सुनिल राम कोळपकर यांचे ते वडील होत.

## सुनंदा गमे



**प्रवरानगर** : राहाता तालुक्यातील केलवड येथील सुनंदा तुकाराम गमे (वय ६०) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, तीन मुली,जावई, नातवंडे असा परिवार आहे. श्री गणेश विद्याप्रसारक मंडळातील सेवानिवृत्त सेवक तुकाराम घन्सी गमे यांच्या त्या पत्नी, इंजिनीयर सागर गमे यांच्या मातोश्री होत.

## ह.भ.प. केदु सोनवणे



**कोळपेवाडी** - कोपरगाव तालुक्यातील ओगदी येथील ह.भ.प.केदु विठोबा सोनवणे यांचे नुकतेच वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले आहे. त्यांच्या मागे दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. श्री भुलेश्वर माध्यमिक विद्यालयाचे सेवानिवृत्त शिक्षक कैलास सोनवणे व गोपीनाथ सोनवणे यांचे ते वडील होते.

**Name Correction**

Amol Ashok Jamdhade and Amol Ashokrao Jamdhade, Savali Vihir Khurd, Tal. Rahata - both names are same. In school documents Licence, it is "Amol Ashokrao Jamdhade", while in Aadhaar Card, PAN Card, voter Card it is "Amol Ashok Jamdhade". Both names are same. Henceforth will be known only as Amol Ashok Jamdhade.

**CHANGE OF THE NAME**

MY OLD NAME IS FARJANA BANO RIYAJ KHAN AND MY NEW NAME IS FARJANA SHAFIK SHAIKH ADDRESS EKWADI POST HAREGAON SHRIRAMPUR 413718

**CHANGE OF NAME**

I have Changed My Old Name SAMARATHARAM TALASARAM KALBI. My New Name Is SAMARATHARAM TALASARAMAJI KALBI. Both names are same person and person is same not any other person. AFF No 1652242041268100730194 Date 27/10/2026.

# अवैध मटका-जुगार बंद न झाल्यास २ नोव्हेंबरपासून धरणे आंदोलन; शिवसेनेचे शहरप्रमुख गणन हाडा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** कोपरगाव शहर व तालुक्यात सुरू असलेले अवैध मटका-जुगाराचे प्रकार तातडीने बंद करावेत, अशी मागणी शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) कोपरगाव शहरप्रमुख गणन हाडा यांनी केली आहे. या अवैध धंद्यांवर प्रशासनाने योग्य ती कारवाई न केल्यास २ नोव्हेंबर २०२६ पासून छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात येईल, असा इशारा त्यांनी निवेदनाद्वरे दिला आहे.यावेळी समाजसेवक लक्ष्मण साबले भावेश थोरात निखिल क्रंकाले पीयूष सैंदाने अदि उपस्थित होते.




यासंदर्भात गणन हाडा यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांना निवेदन सादर केले आहे. कोपरगाव शहर पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांकडे यापूर्वीही अवैध मटका-जुगार बंद करण्याबाबत निवेदन देण्यात आले होते. मात्र, या प्रश्नावर ठोस कारवाई होत नसल्याने आंदोलनाचा निर्णय घ्यावा लागत असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. अवैध मटका-जुगारामुळे सर्वसामान्य नागरिक आणि तरुण पिढीवर विपरीत परिणाम होत असून, अशा प्रकारांना आळा घालणे आवश्यक आहे. प्रशासनाने या गंभीर प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन अवैध धंदे बंद करण्यासाठी प्रभावी कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दुष्काळसदृश परिस्थितीमुळे नागरिक आधीच अडचणीत असताना प्रशासनाने जनतेला सहकार्य करणे अपेक्षित आहे. मात्र, अवैध धंद्यांवर नियंत्रण मिळवण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण होत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

# निळवंडेचे शेतीसाठी व पिण्याच्या पाण्यासाठी आवर्तन द्या ; मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी :** निळवंडे धरणाच्या उजव्या कालव्याला शेतीसाठी व जनावरांच्या चाऱ्यासाठी पिण्याच्या पाण्यासाठी तातडीने आवर्तन द्यावे अशी मागणी एका लेखी निवेदनाद्वरे निळवंडे धरण उजवा कालवा कृती समितीचे अध्यक्ष भारतराव गीते यांनी जलसंपदा तथा पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे एका पत्रकान्वये शेतकऱ्यांच्या वतीने केली आहे

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की दिवाळीपूर्वी ऑक्टोबर च्या उन्हाने संगमनेर तालुक्याच्या पुर्व भागात तीव्र पाणीटंचाई जाणवत असून पिण्याच्या पाण्याचा व जनावरांच्या चाऱ्याचा भीषण प्रश्न निर्माण होत असल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी नोव्हेंबर मध्ये पिण्याचे व शेतीचे रोटेशन मिळावे अशी मागणी शेतकरी वर्ग करीत असून त्यामुळे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न सुटू शकतो तसेच रब्बीतील पिके उभे वाचवणे व चारा पिके करणे शेतकऱ्यांना सोयीचे होईल व पशुधन वाचेल अशी अपेक्षा शेतकरी वर्गातुन व्यक्त होत आहे नुकत्याच झालेल्या निळवंडे पाणी वाटप बैठकीमध्ये पालकमंत्र्यांच्या आदेशाने डिसेंबर व जानेवारी ते फेब्रवारी सिंचन आवर्तन देण्याच्या सुचना करण्यात आल्या आहे तरी शेतकरी वर्गाच्या मागणीचा सकारात्मक विचार करावा अशी अपेक्षा बळीराजा व्यक्त करित आहे निळवंडे कालवा लाभधारक शेतकर्यांचे एक शिष्टमंडळ जलसंपदा मंत्री ना राधाकृष्ण विखे पा भेट घेणार असल्याची माहिती कृती समितिचे अध्यक्ष भारतराव पा गिते उपाअध्यक्ष विक्रम थोरात, कार्याध्यक्ष अ‍ॅड. पोपटराव वाणी, कार्यकरणी सदस्य सुरेश नागरे, संदिपराव घुगे, रावसाहेब घुगे, भिमराज हारदे, अ‍ॅड. जगनर सरपंच प्रमोद बोंद्रे, प्रकाश शिंदे, सरपंच सतिश जोशी, राजेंद्र गायकवाड, सचिन आव्हाड अदिनी दिली आहे.



# नावात बदल

मी **राजीव दिलीपराव औटी** रा. पारनेर जि. अहिल्यानगर या स्वयंघोषणा पत्राद्वारे लिहून देतो माझे पुर्वीचे नाव **राजीव दिलीपराव औटी** होते व सध्याचे नाव **राजीव दिलीप औटी** असे आहे. यापुढे सर्व कागदोपत्री माझे नाव **राजीव दिलीप औटी** असेच राहील.



सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

**बुधवार दि. २८ ऑक्टोबर २०२६**

| मिलनम डे | | | |
|---|---|---|---|
| उदय-अस्त | | सिंगल ५-१-९ मजबुत | |
| १२० ४३० ६७० | ३-४ | १५८ २४८ २२० | ३६-८४-७१-२०-४९ |

| कल्याण | | | |
|---|---|---|---|
| उदय-अस्त | | सिंगल ९-४-५ मजबुत | |
| १९० २८० २२६ | ०-२ | १५६ १२९ ११० | ०६-३२-४८-७५-२९ |

| मुंबैम (मेन) | | | |
|---|---|---|---|
| उदय-अस्त | | सिंगल ४-७-९ मजबुत | |
| १२५ २६० २३४ | ८-१ | १२८ १४६ १०० | ८६-२१-५४-९७-१० |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 27/07/2026 to 31/07/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 07/08/2026 | 234 90 569 | 170 85 159 | 338 42 129 | 460 09 478 | 370 05 348 |
| 10/08/2026 to 14/08/2026 | 577 99 234 | 230 53 148 | 250 70 235 | 355 39 135 | 133 76 358 |
| 17/08/2026 to 21/08/2026 | 240 60 460 | 278 73 346 | 116 82 480 | 156 23 779 | 449 77 179 |
| 24/08/2026 to 28/08/2026 | 360 96 790 | 255 23 229 | 789 42 237 | 450 98 440 | 266 41 290 |
| 31/08/2026 to 04/09/2026 | 149 43 670 | 170 81 560 | 159 52 336 | 690 50 235 | 577 99 135 |
| 07/09/2026 to 11/09/2026 | 680 47 557 | 228 27 124 | 570 26 358 | 112 43 779 | 445 33 689 |
| 14/09/2026 to 18/09/2026 | 789 47 124 | 336 20 136 | 799 56 178 | 680 42 345 | 399 16 790 |
| 21/09/2026 to 25/09/2026 | 390 25 348 | 457 62 129 | 480 23 599 | 166 30 479 | 150 60 280 |
| 28/09/2026 to 02/10/2026 | 669 19 135 | 137 18 279 | 260 84 257 | 660 29 126 | 369 84 770 |
| 05/10/2026 to 09/10/2026 | 140 57 250 | 459 85 168 | 130 48 567 | 469 99 126 | 558 84 590 |
| 12/10/2026 to 16/10/2026 | 160 79 568 | 290 11 669 | 122 58 189 | 130 46 123 | 257 42 480 |

| माधुरी बाजार डे | माधुरी बाजार नाईट |
|---|---|
| ७७० | १२७ |
| ४६ | ०३ |
| २७७ | २३८ |

# स्पेलिंग बी स्पर्धेत यशस्वी स्वरा वाखुरेचा सत्कार




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** स्पेलिंग बी स्पर्धेत तालुक्यात दुसरी आलेल्या भालगावच्या स्वरा वाखुरेचा सत्कार केंद्रप्रमुख बाळासाहेब काशीद यांच्या हस्ते करण्यात.जिल्हा परिषद शाळांमधील इयत्ता तिसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभाग अहिल्यानगर व विनोबा कार्यक्रमांतर्गत आयोजित स्पेलिंग बी स्पर्धा ही ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा इंग्रजी विषयाविषयी आत्मविश्वास वाढवणारी ठरेल असे प्रतिपादन केंद्रप्रमुख बाळासाहेब काशीद यांनी केले. त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलात नुकत्याच पार पडलेल्या तालुकास्तरीय स्पेलिंग बी स्पर्धेत नेवासा तालुक्यातील जिल्हा परिषद सेमी इंग्रजी शाळा भालगाव मधील इयत्ता पाचवी व सहावी च्या गट दोन मधून कुमारी स्वरा संतोष वाखुरे या पाचवी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थीनीने तालुक्यात द्वितीय क्रमांक मिळवत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली त्याबद्दल नेवासा बुद्रुक केंद्राचे केंद्रप्रमुख बाळासाहेब काशीद आणि नेवासा तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष श्री हरिभाऊ जाधव यांच्या हस्ते स्वरा वाखुरे हिचा शाल,पुष्पगुच्छ व शैक्षणिक साहित्य देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे भालगाव चे सरपंच दादासाहेब खरात, उपसरपंच बाळासाहेब आहेर,चित्रकार भारतकुमार उदावंत,पालक संतोष वाखुरे,मुख्याध्यापक अविनाश भालेराव,तंत्रस्नेही शिक्षक प्रविणकुमार हराळ आदी उपस्थित होते.यावेळी विजेती विद्यार्थिनी स्वरा वाखुरे ला मार्गदर्शन करणाऱ्या राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त वर्गशिक्षिका शितल झरेकर-आठरे यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष हरिभाऊ जाधव यांनी मनोगत व्यक्त करत उपस्थितीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षिका जनाबाई जाधव,पल्लवी तरवडे आदींचे सहकार्य लाभले.स्पेलिंग बी स्पर्धेत जिल्हा स्तरावर पात्र ठरलेल्या स्वरा वाखुरे हिचे गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड,विस्तार अधिकारी योगेश राणे,सोसायटी चे चेअरमन युवराज तनपुरे,पोलीस पाटील बाळकृष्ण भागवत,शाळा व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष रमेश तनपुरे,मुख्याध्यापक राजेंद्र सोनवणे आदींसह ग्रामस्थ पालक यांनी अभिनंदन केले .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पदवीधर शिक्षक राहुल आठरे यांनी केले.

## जाहिर नोटीस

**अ‍ॅड. टी. ए. पठाण**
**शेवगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर**
**मो.नं. ९८८१३९६३०२.**

**शेवगाव येथील मे. ज्युडी. मॅजी. साहेब वर्ग १**
**फौ.क्रि. अ.नं. ३२४ / २०२६**

**अर्जदार – विठ्ठल पाराजी गुंजाळ**

**सामनेवाले – मामा. ग्राम विकास अधिकारी.**

**यांचे कोर्टात...**

१. अर्जदार यांची पत्नी कै. छबुबाई विठ्ठल गुंजाळ या दि. २७/१२/१९९७ रोजी हातगाव, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर येथे मयत झाल्या आहेत. त्यानंतर हिंदु चालीरिती रिवाजाप्रमाणे कै. छबुबाई विठ्ठल गुंजाळ यांचा अंत्यविधी मौजे हातगाव येथे त्याच दिवशी झालेला आहे. कै. छबुबाई विठ्ठल गुंजाळ यांचे मृत्युनंतर सा.वाले यांचेकडे रेकॉर्डला परस्पर मृत्युची नोंद होईल अशी अर्जदार यांची धारणा असल्यामुळे, अर्जदार यांनी कै. छबुबाई विठ्ठल गुंजाळ यांचे मृत्युची नोंद करणेसाठी सा.वाले यांना माहिती दिली नाही. अर्जदार यांचे अज्ञानामुळे कै. छबुबाई विठ्ठल गुंजाळ यांचे मृत्युची नोंद जन्म मृत्यु रजिस्टरला करण्याचे राहुन गेले आहे.

२. अर्जदार यांना वारस नोंदीसाठी व इतर शासकिय कामासाठी कै. छबुबाई विठ्ठल गुंजाळ यांचे मृत्यु दाखल्याची आवश्यकता भासल्याने, त्यामुळे अर्जदार यांनी कै. छबुबाई विठ्ठल गुंजाळ हिचे मृत्यु दि. २७/१२/१९९७ रोजी सामनेवाले यांचे रजिस्टरला घेवून, अर्जदार यांना मयत छबुबाई विठ्ठल गुंजाळ हिचे मृत्यु प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. त्याअर्थी सदरहु अर्जदार यांची पत्नी छबुबाई विठ्ठल गुंजाळ हिचे सदरहु मृत्यु प्रमाणपत्राबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर ह्या जाहीर नोटीसीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत दि. २१ /११ / २०२६ पुर्वी त्याने ह्या मे. कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात. त्यानंतर मे. कोर्ट साहेब हे अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास मृत्यु प्रमाणपत्र देणेबाबत आदेश करतील. आज दि. २१ माहे १० सन २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यनिशी दिले.

**क. लिपिक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर**
**शेवगाव**

**हुकूमावरुन......**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर**
**शेवगाव**

## द•ख•ल



### कैलास उदमले यांच्या शिक्षण क्षेत्रातील २५ वर्षांच्या योगदानाचा गौरव!

**श्रीगोंदा :** शिक्षण क्षेत्रात सातत्याने २५ वर्षे योगदान देत विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसह मराठी भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी महत्त्वपूर्ण कार्य करणारे जुहू येथील नामांकित माणिकजी कूपर शाळेचे मराठी विभागप्रमुख कैलास उदमले यांचा शाळेच्या वार्षिक कार्यक्रमात विशेष सन्मान करण्यात आला. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. पर्सिस वाडिया यांच्या हस्ते त्यांना शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.या कार्यक्रमाला मुंबईतील प्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ आणि शाळेचे माजी विद्यार्थी डॉ. कामदार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका सौ. पर्सिस वाडिया होत्या. त्यांनी प्रास्ताविकातून शाळेच्या प्रगतीचा आढावा घेत कैलास उदमले यांच्या शैक्षणिक योगदानाचे कौतुक केले. शाळेच्या वरिष्ठ इंग्रजी विषयाच्या शिक्षिका सौ. सलमा नक्की यांनी उदमले यांचा परिचय करून दिला. उदमले हे मुक्त पत्रकार असून, एखाद्या विषयाचा सखोल अभ्यास करून त्याची मांडणी करण्याची त्यांची हातोटी वैशिष्ट्यपूर्ण आहे. पत्रकारितेतील अनुभवाचा उपयोग त्यांनी मराठी विषयाच्या अध्यापनातही केला. गेल्या २५ वर्षांत त्यांनी शाळेच्या विविध उपक्रमांना सक्रिय सहकार्य केले, विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घातली आणि मराठी भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी मोलाचे योगदान दिले, असे त्यांनी सांगितले.प्रमुख पाहुणे डॉ. कामदार यांनी आपल्या भाषणात जीवनाच्या जडणघडणीत शाळा आणि शिक्षकांचे महत्त्व अधोरेखित केले. आणली.कार्यक्रमाच्या शेवटी उपमुख्याध्यापक निमिष वोरा, सबीहा अहमद, देलशाद दुमासिया आणि निमिषा चतुर्वेदी यांनी उपस्थितांचे आभार मानले.शिक्षण, पत्रकारिता आणि मराठी भाषेच्या संवर्धनाचा संगम साधणाऱ्या कैलास उदमले यांच्या २५ वर्षांच्या सेवेला मिळालेला हा सन्मान त्यांच्या समर्पित कार्याची पोचपावती ठरला.

### नवजीवन विद्यालयात आकाशकंदील निर्मिती कार्यशाळा उत्साहात संपन्न




**एरंडगाव :** शेवगाव तालुक्यातील दहिगाव-ने येथील नवजीवन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दिवाळी सणाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आकाशकंदील निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कल्पकतेतून आणि सर्जनशीलतेतून आकर्षक आकाशकंदील तयार केले. विद्यार्थ्यांनी विविध रंग, आकर्षक रचना आणि नावीन्यपूर्ण कल्पनांचा वापर करून स्वतःच्या हातांनी सुंदर आकाशकंदील साकारले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलात्मक कौशल्याला चालना मिळण्याबरोबरच त्यांच्यातील सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि स्वनिर्मितीचा आनंद विकसित होण्यास मदत झाली. तसेच भारतीय सण-परंपरांची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. या कार्यशाळेसाठी सोनवणे सर व उंडे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध कल्पना प्रत्यक्षात उतरवत आकर्षक आकाशकंदील तयार केले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या या उपक्रमामुळे शालेय परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या कलात्मक आणि सर्जनशील क्षमतांचा विकास व्हावा, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेली ही कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी आनंददायी आणि प्रेरणादायी ठरली. 'शिकता शिकता निर्माण करण्याचा आनंद' देणाऱ्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला नवी दिशा मिळाली असून, दिवाळीचा आनंदही द्विगुणित झाला.

### रेसिडेन्शिअल हायस्कूलच्या विद्यार्थ्यांकडून स्नेहालयातील अनाथ मुलांना वस्तुरूपात मदत



**शेवगाव :** सामाजिक बांधिलकीची जाणीव जपत रेसिडेन्शिअल हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी अहिल्यानगर येथील स्नेहालयातील अनाथ व गरजू मुलांना विविध वस्तूंच्या स्वरूपात मदत केली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी सामाजिक संवेदनशीलता, सहकार्य आणि माणुसकीचे दर्शन घडविले. विद्यार्थ्यांनी टूथपेस्ट, टूथब्रश, साबण, तेल, उटणे,नेल कटर आदी उपयोगी वस्तू स्नेहालयातील मुलांना देऊन त्यांच्या आनंदात सहभागी होण्याचा प्रयत्न केला. लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक सेवेची भावना रुजावी, गरजू व्यक्तींबद्दल आपुलकी निर्माण व्हावी आणि समाजाप्रती आपली जबाबदारी समजावी, हा या उपक्रमामागील उद्देश होता. टूथपेस्ट, टूथब्रश, साबण, तेल, उटणे,नेल कटर आदी उपयोगी वस्तू विद्यालयाचे प्राचार्य बालाजी गायकवाड यांच्या हस्ते स्नेहालय संस्थाच्या अध्यक्षा जयाताई जोगदंड यांच्याकडे सुपूर्द करण्यात आल्या. याप्रसंगी स्नेहालय संस्थाच्या अध्यक्षा जयाताई जोगदंड यांनी विद्यालयातील सर्व विद्यार्थ्याचे कौतुक केले व धन्यवाद मानले .सदर उपक्रम प्राचार्य बालाजी गायकवाड व ज्येष्ठ शिक्षक चंद्रकांत अमृते यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आला. शिक्षणासोबतच सामाजिक मूल्यांची जपणूक करणेही महत्त्वाचे आहे. रेसिडेन्शिअल हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी राबविलेल्या या उपक्रमातून दातृत्व, सहकार्य आणि माणुसकीचा सुंदर संदेश समाजापर्यंत पोहोचला. याप्रसंगी स्नेहालय संस्थाच्या अध्यक्षा जयाताई जोगदंड, युवा निर्माण प्रकल्प प्रमुख विकास सुतार , उडान प्रकल्प टीमने मेंबर तुषार केदारी, क्षेत्रीय अधिकारी शेवगाव चे अंबादास शिंदे, उचल फाउंडेशन शेवगाव च्या सुजाता खेडकर, सकाळ चे पत्रकार सचिन सातपुते डॉक्टर संजय लड्डा, तसेच विद्यालयाचे प्राचार्य बालाजी गायकवाड, पर्यवेक्षक महेश शिंदे,ज्येष्ठ शिक्षक चंद्रकांत अमृते, सुनील गोर्डे, अमोल पवार, प्रमोद कानडे, शिवगंगा कांजवणे, स्वाती ढोले, स्वाती गायकवाड, माधुरी देशमुख आदी उपस्थित होते.

# हिंदुत्व बद्दल नकारात्मक चर्चा चुकीची : डॉ. ललित गुगळे

**अविनाश मंत्री। राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी : शहराचा दिवसेंदिवस चोहो बाजूंनी विस्तार होत असून, शहरातील लोकसंख्येतही वाढ होत आहे. मृत व्यक्तीच्या सोयीसाठी पारनेर-आळकुटी रोडलगत सर्व सुविधायुक्त अमरधाम उभारण्यात आले आहे. मात्र, या अमरधाममधील दुसरी शवदाहिनी अद्याप उघड्यावर असल्याने अंत्यविधीच्या वेळी नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः पावसाळ्यात किंवा एकाच वेळी दोन अथवा त्यापेक्षा अधिक अंत्यविधी करावे लागल्यास मृत व्यक्तींच्या नातेवाईकांची मोठी गैरसोय होत आहे. त्यामुळे पारनेर नगरपंचायत प्रशासनाने या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन दुसऱ्या शवदाहिनीसाठी सर्व सुविधायुक्त शेड उभारावे, अशी मागणी नगरसेवक अशोक चेडे यांनी केली आहे.**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारसरणीचे महत्त्व सर्व समाजाला पटू लागले असून हिंदुत्वाबद्दल नकारात्मक चर्चा चुकीची आहे. ज्या संस्कृतीने संपूर्ण जगाला दिशा दिली, ती संस्कृती स्वीकारूनच पुढे जावे लागेल, असे मत शहरातील जेष्ठ बालरोग तज्ञ व विचारवंत डॉ. ललित गुगळे यांनी व्यक्त केले. विजयादशमी उत्सवानिमित्त शहरातून स्वयंसेवकांनी सघोष संचलन काढले. त्यानंतर आप्पासाहेब राजळे मंगल कार्यालयात मुख्य कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी प्रमुख वक्ते म्हणून पश्चिम महाराष्ट्र प्रांत शारीरिक मंडळ सदस्य दिगंबर देवरकोंडा, व तालुका संघचालक अरविंद पारगावकर व्यासपीठावर उपस्थित होते. प्रबोधन कार्यक्रमासाठी संघ स्वयंसेवकांसह शहरातील विविध मान्यवर लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सामाजिक समरसता, पर्यावरण, नागरिक कर्तव्य, कुटुंब प्रबोधन, स्वबोध या पंचपरिवर्तन सूत्रीवर आधारित मार्गदर्शन मान्यवरांनी केले .



दिगंबर देवरकोंडा यांनी तालुका शाखेच्या गुणात्मक वाढीचे कौतुक करत संघाने सामाजिक क्षेत्रामध्ये केलेल्या योगदानाचा आढावा घेत जिल्ह्यातील विविध प्रसंगांचे संदर्भ दिले.

यावेळी बोलताना डॉ . गुगळे म्हणाले, नैसर्गिक आपत्तीमध्ये संघाची भूमिका, सेवा व कार्य प्रत्येक वेळी प्रशंसनीय ठरले आहे. देशाच्या इतिहासात अनेक धर्म येऊन गेले. हजारो वर्षांपूर्वीचा प्राचीन इतिहास आपल्या देशाला असून हिंदू धर्म मात्र चिरंतन टिकला. विविधतेत एकता असलेल्या देशात चार हजार पाचशे जाती असून १९५० भाषा बोलल्या जातात. अनुवंशिय शास्त्राचा विचार केला तर ३५ हजार वर्षांपूर्वीचा इतिहास ज्ञात आहे. भारत देशाची रचना खूप छान आहे. आपण सर्वजण या भूमीची लेकरे आहोत. अशी बंधुत्वाची भावना हीच आमची सामाजिक शक्ती आहे. स्वतःबद्दलचा अभिमान हरवून बसल्यामुळे आपले मोठे नुकसान झाले आहे. हा आघात ब्रिटिशांनी आपल्या संस्कृतीवर, धर्मावर केला. हिंदू संस्कृतीची ओळख जगाला आता सकारात्मकतेने होत आहे. आपली भाषा, संस्कृती, धर्म याचा जगाला आदर वाटतो. मात्र माध्यमांमधून जीवनपद्धतीचे विकृतीकरण होत आहे. भारतीयत्वाचा अभिमान ठेवून परस्परांविषयी आदरभाव बाळगत पुढे वाटचाल करावी लागेल. असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शैलेश शिरसाठ यांनी केले. नानासाहेब पालवे यांनी पद्य सादर केले. डॉ. सुनील फुंदे व विशाल दानापुरे यांनी अमृत वचने सांगितली. गणेश पाथरकर यांनी आभार मानले.

## ग्रामपंचायतीच्या चौकशीसह धोकादायक गाववेशीच्या प्रश्नावर कारवाई करा

### अन्यथा १७ नोव्हेंबरपासून आमरण उपोषण

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** ठाकूर निमगाव ग्रामपंचायतीच्या विविध विकासकामांची सखोल चौकशी करावी तसेच गावातील धोकादायक गाववेशीची तातडीने पाहणी करून आवश्यक कार्यवाही करावी, या मागण्यांसाठी ड. लक्ष्मण पांडुरंग मडके (पत्रकार) आणि उद्योजक साईनाथ पंढरीनाथ कातकडे यांनी पंचायत समिती, शेवगाव येथील गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. दि. १६ नोव्हेंबर २०२६ पर्यंत मागण्यांवर ठोस कार्यवाही न झाल्यास दि. १७ नोव्हेंबरपासून पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

अर्जदारांनी दिलेल्या निवेदनानुसार, ठाकूर निमगाव ग्रामपंचायतीकडून मागितलेली माहिती विहित मुदतीत न मिळाल्याने तसेच ग्रामपंचायतीच्या विविध शासकीय योजना, विकासकामे आणि खर्चाची सखोल चौकशी करण्याच्या मागणीसाठी त्यांनी २३ जुलै २०२६ रोजी पंचायत समितीकडे अर्ज केला होता. या अर्जाच्या अनुषंगाने गटविकास अधिकाऱ्यांनी १८ ऑगस्ट २०२६ रोजीच्या पत्रानुसार चार अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी समिती नियुक्त केली होती. मात्र, पुरेसा कालावधी उलटूनही चौकशीचा अहवाल किंवा त्यावरील कार्यवाहीची स्पष्ट माहिती मिळाली नसल्याचा दावा अर्जदारांनी केला आहे.

चौकशी निष्पक्षपणे व्हावी, यासाठी पूर्वी नियुक्त केलेली समिती बदलून स्वतंत्र समिती नेमावी, अशी मागणीही २१ सप्टेंबर रोजी करण्यात आली होती. तथापि, या मागणीवरही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## भीमाशंकर परिसरातील टोरंट पॉवरचा प्रकल्प रद्द करा!

### पर्यावरणप्रेमींचे तहसीलदारांना निवेदन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** भीमाशंकर परिसरातील प्रस्तावित टोरंट पॉवर कंपनीच्या जलविद्युत व ऊर्जा साठवणूक प्रकल्पामुळे वनसंपत्ती, जैवविविधता, वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास आणि जलस्रोतांवर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त करत हा प्रकल्प रद्द करण्याची मागणी पाथर्डी तालुक्यातील पर्यावरणप्रेमी व निसर्गप्रेमी नागरिकांनी केली आहे. यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते उबेद आतार यांच्या वतीने सोमवारी पाथर्डीचे तहसीलदार डॉ. उद्धव नाईक यांना निवेदन देण्यात आले.

भीमाशंकर व सह्याद्रीचा परिसर समृद्ध जैवविविधता, घनदाट वनसंपत्ती, दुर्मिळ व औषधी वनस्पती तसेच विविध वन्यजीवांच्या अधिवासासाठी महत्त्वाचा आहे. या परिसरात



प्रस्तावित प्रकल्पासाठी वृक्षतोड, डोंगरांचे उत्खनन आणि मोठ्या प्रमाणावर बांधकामे झाल्यास नैसर्गिक पर्यावरणाचा ऱ्हास होण्याची शक्यता निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. वन्यजीवांचे अधिवास व भ्रमणमार्ग बाधित होऊन मानव-वन्यजीव संघर्ष वाढण्याचाही धोका असल्याचे नागरिकांनी म्हटले आहे.

तसेच, प्रकल्पामुळे नैसर्गिक ओढे, नद्या, झरे, भूजलसाठे आणि पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांवर परिणाम होऊ शकतो. डोंगरउतारांचे स्थैर्य धोक्यात येणे, मातीची धूप, गाळ साचणे, ध्वनी व वायुप्रदूषण तसेच भूस्खलनासारख्या समस्या उद्भवण्याची शक्यताही निवेदनात नमूद करण्यात आली आहे. स्थानिक शेतकरी, ग्रामस्थ आणि आदिवासी समाजाच्या जमिनी, वनहक्क व पारंपरिक उपजीविकेवर परिणाम होण्याची भीतीही व्यक्त करण्यात आली आहे.

प्रस्तावित प्रकल्पाला तातडीने स्थगिती देऊन पर्यावरणीय परिणामांचा सखोल अभ्यास पूर्ण होईपर्यंत वृक्षतोड, उत्खनन व बांधकामास परवानगी देऊ नये, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. वनसंपत्ती, जैवविविधता, वन्यजीवांचे अधिवास, जलस्रोत आणि भूगर्भीय स्थैर्य यांचा स्वतंत्र व निष्पक्ष तज्ज्ञ समितीमार्फत अभ्यास करावा. भीमाशंकर वन्यजीव अभयारण्य, पर्यावरण-संवेदनशील क्षेत्र आणि वनजमिनीशी प्रकल्पाचा संबंध तपासून संबंधित कायदे व पर्यावरणीय नियमांचे काटेकोर पालन करावे, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास लोकशाही मार्गाने व कायदेशीर चौकटीत जनआंदोलन उभारण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. या मागणीस उबेदभाई आतार, अनिल खाटेर, डॉ. दीपक देशमुख, डॉ. अंबिका वाघ, राजेंद्र काळे, डॉ योगीराज देशमुख श्रीकांत काळोखे सर, सुखदेव मर्दाने संदीप राठोड, अभय गांधी, विनायक चौधरी, सुमित तरवडे अविनाश पालवे आदींनी पाठिंबा दिला आहे.

## पावसाने मारले, घोड-कुकडीच्या पाण्याने तारले!

### आ. विक्रम पाचपुते यांच्या पाठपुराव्याला यश

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** पावसाने ओढ दिल्याने संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना घोड-कुकडीच्या पाण्याचा आधार मिळणार आहे. कुकडी प्रकल्पाचे शेतीसाठीचे आवर्तन ५ नोव्हेंबरपासून, तर घोड प्रकल्पाचे आवर्तन १० नोव्हेंबरपासून सोडण्याचा निर्णय कालवा सल्लागार समितीने घेतला आहे. या आवर्तनासाठी आमदार विक्रम पाचपुते यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आल्याचे मानले जात आहे. पाण्याअभावी अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याबरोबरच फळबागा जगविण्यास आणि काही भागांतील पिण्याच्या पाण्याचा तात्पुरता प्रश्न सोडविण्यास मदत होण्याची आशा आहे.

श्रीगोंदा तालुक्यात पावसाने पाठ फिरवल्याने हातातोंडाशी आलेली पिके संकटात सापडली आहेत. पिकांना पाण्याची गरज असताना पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. अनेक ठिकाणी पिकांची वाढ खुंटली असून, फळबागांनाही पाण्याची नितांत गरज आहे. अशा परिस्थितीत घोड-कुकडीच्या आवर्तनाचा निर्णय शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरणार आहे.

पाण्याअभावी फळबागांचे नुकसान होण्याची भीती असताना आवर्तनातील पाणी त्यांना जगविण्यासाठी महत्त्वाचे ठरणार आहे. उपलब्ध पाण्याचा वेळेत लाभ मिळाल्यास काही फळबागा वाचविणे शक्य होऊ शकते. त्यामुळे संभाव्य नुकसान कमी करण्याची आशा शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे. पावसाअभावी काही गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू करण्याची वेळ आली आहे. घोड-कुकडीच्या आवर्तनामुळे संबंधित भागांतील पाणी उपलब्धतेत सुधारणा झाल्यास टँकरवरील अवलंबित्व तात्पुरते कमी होण्यास मदत होऊ शकते. मात्र, त्यासाठी प्रत्यक्ष पाणी वितरण आणि स्थानिक जलस्रोतांमध्ये होणारी वाढ महत्त्वाची ठरणार आहे. पावसाने शेतकऱ्यांना अडचणीत आणले असले, तरी आता घोड-कुकडीच्या पाण्यावर पिके आणि फळबागा वाचविण्याची आशा निर्माण झाली आहे.

## डेलनेटच्या 'डेटा शेअरिंग व क्सेसिबिलिटी' उपक्रमात शेवगावच्या न्यू आर्ट्स महाविद्यालयाचा गौरव

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** नवी दिल्ली येथील डेलनेट (ऊर्शींशश्रेळिपस डळलीरी छर्शींीज्ञ) संस्थेच्या वतीने शेवगाव येथील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या ग्रंथालयाला 'सर्टिफिकेट ऑफ प्रिसिएशन' देऊन गौरविण्यात आले आहे.

या महाविद्यालयाच्या ग्रंथालयाने डेलनेटच्या माध्यमातून ग्रंथालयीन नोंदी उपलब्ध करून दिल्याबद्दल हा सन्मान प्रदान करण्यात आला.

डे .लनेटच्या 'बेस्ट प्रॅक्टिसेस - डेटा शेअरिंग अँड क्सेसिबिलिटी २०२६-२७' या उपक्रमांतर्गत महाविद्यालयाच्या ग्रंथालयाने सक्रिय सहभाग नोंदविला असून या उपक्रमामुळे विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक तसेच शैक्षणिक क्षेत्रातील अभ्यासकांना ग्रंथालयीन साधनसंपत्ती उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. तसेच महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील साहित्याची माहिती ऑनलाइन उपलब्ध करून देण्यासही या उपक्रमाचा उपयोग होणार आहे.




महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. भाऊसाहेब भिमाजी शेळके आणि संपूर्ण ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांनी केलेल्या योगदानाची दखल घेत डेलनेटच्या संचालक डॉ. संगीता कौल यांच्या स्वाक्षरीने हे प्रशस्तिपत्र प्रदान करण्यात आले. या गौरवामुळे महाविद्यालयाच्या ग्रंथालयाच्या कार्याची शैक्षणिक क्षेत्रात दखल घेतली गेली आहे.

या कामी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . तुकाराम थोपटे यांचे मार्गदर्शन मिळाले असून उपप्राचार्य डॉ . पुरुषोत्तम कुंदे व डॉ. युवराज सुडके यांचे सहकार्य लाभले . ग्रंथपाल प्रा .डॉ . शेळके व सहाय्यक नंदकुमार बर्डे, श्रीमती आयोध्या देवकर, मयूर म्हस्के, निलेश कळकुंबे यानी त्यासाठी योगदान दिले आहे .

# आम्ही माणसं आहोत, जनावरं नाही!

### श्रीगोंद्यात रेशनच्या निकृष्ट धान्यावरून संताप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** सणासुदीच्या दिवसांत सर्वसामान्यांच्या ताटात दर्जेदार अन्न पडण्याऐवजी रेशनवर निकृष्ट दर्जाचे धान्य येत असल्याच्या तक्रारींमुळे श्रीगोंदा तालुक्यात संताप व्यक्त होत आहे. स्वस्त धान्य दुकानांतून वितरित होणारा गहू, मका आणि तांदूळ खाण्यायोग्य नसल्याचा आरोप करत काही नागरिकांनी धान्याचे नमुने थेट तहसीलदारांकडे नेले. या प्रकारामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

तालुक्यातील काही नागरिकांनी संबंधित धान्य तहसीलदारांसमोर सादर करून त्याच्या दर्जाबाबत जाब विचारला. हे धान्य माणसांना खाण्यायोग्य नसून जनावरांनाही खाऊ घालण्याच्या लायकीचे नसल्याची तीव्र प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली.



### धान्याची परिस्थिती न सुधारल्यास अधिकाऱ्यांना शिजवून भात खाऊ घालण्याचा भैय्या वाबळेंचा इशारा

नागरिकांच्या तक्रारीनंतर तहसीलदारांनी धान्य बदलून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. याबाबत पाठपुरावा करून धान्य बदलून देण्याचा प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

**धान्य न सुधारल्यास अधिकाऱ्यांना शिजवून भात खाऊ घालणार!**

माजी जिल्हाध्यक्ष, युवक काँग्रेसचे स्मितल ऊर्फ भैय्या वाबळे यांनी या प्रकारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. रेशनच्या धान्याची परिस्थिती सुधारली नाही, तर हाच भात तालुका पुरवठा निरीक्षक, जिल्हा पुरवठा अधिकारी आणि तहसीलदार यांना शिजवून खाऊ घालणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे निकृष्ट धान्याचा प्रश्न चर्चेत आला असून प्रशासनाने वेळीच ठोस पावले उचलण्याची गरज निर्माण झाली आहे.

**आम्ही माणसं आहोत, जनावरं नाही!**

रेशनवरील धान्य हा गोरगरीब आणि सर्वसामान्य कुटुंबांच्या अन्नसुरक्षेचा महत्त्वाचा आधार आहे. मात्र, गहू, मका आणि तांदळाचा दर्जा निकृष्ट असल्याच्या तक्रारींमुळे लाभार्थ्यांमध्ये नाराजी आहे. आम्ही माणसं आहोत, जनावरं नाही. जनावरंही खाणार नाहीत, असे धान्य आम्हाला कशासाठी दिले जाते? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

सणासुदीच्या काळात रेशनवरील धान्याच्या गुणवत्तेचा प्रश्न ऐरणीवर आल्याने प्रशासनाने केवळ आश्वासनांवर न थांबता धान्याची तपासणी करावी, निकृष्ट साठ्याचे वितरण थांबवावे आणि पात्र लाभार्थ्यांना दर्जेदार धान्य उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी होत आहे.

आता तहसील प्रशासन आणि पुरवठा विभाग या तक्रारींची कितपत दखल घेतात, धान्य बदलून देण्याबाबत काय कार्यवाही करतात आणि संबंधित साठ्याच्या गुणवत्तेची तपासणी होते का, याकडे श्रीगोंदा तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## दखल



# जुन्नर तालुक्यात घरफोडी करणारी आंतरजिल्हा टोळी जेरबंद

## ३८ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त

**आळेफाटा :** जुन्नर तालुक्यात रात्रीच्या वेळी घरफोडी करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीला पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखा व ओतूर पोलीसांनी जेरबंद केले आहे. या टोळीकडून चार घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले असून ३८ लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ०५ ऑक्टोबर २०२६ रोजी ओतूर (ता. जुन्नर )पोलीस स्टेशन हद्दीत घराचे कुलूप तोडून सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेल्याची घटना घडली होती. तसेच नारायणगाव व ओतूर परिसरात अशाच प्रकारच्या चोऱ्या झाल्याने पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांनी स्थानिक गुन्हे शाखेला गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश दिले होते.तपासादरम्यान सीसीटीव्ही फुटेजमध्ये एक संशयित कार दिसून आली. या कारचा ओतूरपासून नाशिकपर्यंत सुमारे ५० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे माग काढण्यात आला. सदर कार नाशिक जिल्ह्यातील वडाळा येथील सोनू उर्फ शरीफ रसूल शेख हा वापरत असल्याची माहिती मिळाली. ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. शुभम कुमार, उपविभागीय अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, सहाय्यक निरीक्षक महादेव शेलार, ओतूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे,पोलीस उपनिरीक्षक युवराज जाधव व पथकाने केली आहे. पुढील तपास युवराज जाधव हे करीत आहेत.

# दौंड तालुक्यातील नाथाचीवाडी परिसरात चोरट्यांच्या घिरट्या

**यवत :** दौंड तालुक्यातील नाथाचीवाडी आणि परिसरात गेल्या दोन ते तीन दिवसांपासून चोरट्यांनी सातत्याने घिरट्या घातल्याने संपूर्ण गावात तीव्र घबराट पसरली आहे. चोरट्यांच्या भीतीने ग्राम स्थांची झोप उडाली असून, संरक्षणासाठी अख्खा गाव रात्रभर जागा राहत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

स्थानिक सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या दोन-तीन रात्रींपासून परिसरामध्ये काही संशयास्पद व्यक्ती वावरताना आणि घरांची पाहणी करताना आढळून आल्या आहेत. काही ठिकाणी चोरांनी चोऱ्या करण्याचा किंवा घरात घुसून मारण्याचा प्रयत्न केला आहे. या लागोपाठच्या घटनांमुळे महिला, लहान मुले आणि वृद्धांमध्ये कमालीची भीती निर्माण झाली आहे.चोरट्यांचा सुगावा लागताच गावातील तरुणांनी एकत्र येत रात्रीची गस्त (पायदळ पहारा) सुरू केली आहे. हातात काठ्या आणि टॉर्च घेऊन ग्रामस्थ स्वतःच गावाचे रक्षण करत आहेत.या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन यवत पोलिसांनी नाथाचीवाडी आणि लगतच्या वाड्या-वस्त्यांवर रात्रीची पोलीस गस्त (पेट्रोलिंग) त्वरित वाढवावी, अशी मागणी संतप्त व भयभीत झालेल्या नागरिकांनी केली आहे. चोरट्यांचा लवकरात लवकर बंदोबस्त करून गावात शांतता प्रस्थापित करावी, अशी विनवणी स्थानिक ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# आळंदीत २९ ऑक्टोबरला 'साहित्यनिष्ठांची मांदियाळी'

**आळंदी :** संत ज्ञानेश्वर माउलींच्या साहित्यिक वारशाचा गौरव करणारा 'साहित्यनिष्ठांची मांदियाळी' हा सोहळा गुरुवारी (ता. २९) आळंदीत आयोजित करण्यात आला आहे. ६९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आठवणींना उजाळा देणारा आणि १०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची नांदी ठरणाऱ्या या कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ संगीतकार पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या हस्ते होणार आहे.

आळंदीतील फ्रूटवाले धर्मशाळेत सकाळी नऊ वाजता कार्यक्रमाला सुरुवात होईल. विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, महाराष्ट्र साहित्य परिषद आणि राज्याच्या मराठी भाषा विभागाच्या संयुक्त विद्यमाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन सम ाधी मंदिरापासून कार्यक्रमस्थळापर्यंत ग्रंथदिंडी काढण्यात येणार असून, ग्रंथपूजनही होणार आहे.

संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत उल्हासदादा पवार असतील, तर डॉ. श्रीपाल सबनीस सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. दुपारी ह.भ.प. गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या चक्री भजनाचे सादरीकरण होईल. त्यानंतर संत, कीर्तनकार आणि प्रवचनकार यांच्या योगदानावर विचारमंथन होणार आहे. प्रसिद्ध अभिनेत्री मधुरा वेलणकर आणि डॉ. समीरा गुजर यांचा 'ज्ञानदेवे रचिला पाया' हा सांस्कृतिक कार्यक्रमही सादर केला जाणार आहे.

# दिवाळीत खासगी बसकडून निर्धारित भाड्यापेक्षा अधिक आकारणी केल्यास कारवाई

## प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा इशारा; तक्रारी नोंदविण्याचे आवाहन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** दिवाळीच्या कालावधीत खासगी प्रवासी बसमालकांनी शासनाने निश्चित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक भाडे आकारू नये. निर्धारित भाड्यापेक्षा अधिक आकारणी करणाऱ्या बसमालकांविरुद्ध मोटार वाहन कायदा, १९८८ व संबंधित नियमांनुसार कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी दिला आहे.

दिवाळीच्या काळात प्रवाशांची संख्या वाढत असल्याने काही खासगी बसम ालकांकडून मनमानी पद्धतीने अधिक भाडे आकारले जात असल्याच्या तक्रारी येतात. या पार्श्वभूमीवर प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे बसमालक संघटनेच्या प्रतिनिधींसमवेत बैठक घेण्यात आली. या बैठकीत प्रवाशांची आर्थिक पिळवणूक रोखणे आणि रस्ते सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजनांबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल भोसले, परिविक्षाधीन सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल फसले, परिविक्षाधीन सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी रोहित आर्सुळ यांच्यासह बसमालक संघटनेचे एकूण २६ प्रतिनिधी उपस्थित होते.

**शासनाने २० एप्रिल २०१८ रोजीच्या निर्णयानुसार खासगी बसमालकांना निर्धारित केलेल्या भाड्याच्या मर्यादेतच प्रवासी भाडे आकारणे बंधनकारक आहे. या मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यांवर दिवाळीच्या कालावधीत विशेष लक्ष ठेवून कारवाई करण्यात येणार आहे.**

प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी बसचालकांनी मद्यपान करून वाहन चालवू नये, वाहन चालविताना भ्रमणध्वनीचा वापर करू नये, वाहन चालविताना सुरक्षिततेचे नियम पाळावेत, प्रवाशांच्या सुरक्षिततेची काळजी घ्यावी आणि वाहनातील सर्व आवश्यक कागदपत्रे वैध स्थितीत ठेवावीत.

प्रवाशांनी अधिक भाडे आकारणी किंवा इतर नियमभंग आढळल्यास व्हॉट्सॲप क्रमांक ८२७५३३०२०९ यावर संबंधित तक्रार नोंदवावी. आपले नाव, भ्रमणध्वनी क्रमांक आणि तिकिटाचा छायाचित्रासह वरील व्हॉट्सॲप क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालयाने केले आहे.



# कवठे येमाई तील बहुचर्सचीत गायरान गट क्र. ३२६ ची शासकीय मोजणी पूर्ण

## अतिक्रमणाच्या जुन्या वादाला पूर्णविराम मिळण्याची अपेक्षा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यातील कवठे येमाई गावठाणालगत असलेल्या बहुचर्चित सरकारी गायरान गट क्रमांक ३२६ ची आज शासकीय मोजणी पूर्ण करण्यात आली. लवकरच दिशा,हद्द कायम करून 'क' पत्रक मिळणार असल्याची माहिती ग्रामविस्तार अधिकारी तथा प्रशासक बी. आर. गावडे यांनी बोलताना दिली.

**शासकीय मोजणीकडे ग्रामस्थांचे लक्ष**

**गायरान जमिनीच्या हद्दीचा प्रश्न हा गावातील सर्वसामान्य नागरिकांसाठी महत्त्वाचा ठरला आहे. आता शासकीय मोजणी पूर्ण झाल्याने जमि नीची अधिकृत हद्द निश्चित होण्याचा मार्ग मोकळा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दिशा,हद्द कायम करून 'क' पत्रक प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणातील वस्तुस्थिती अधिक स्पष्ट होणार आहे. अनेक वर्षांपासून चर्चेत असलेल्या या गायरान जमिनीच्या प्रश्नावर शासकीय मोजणीनंतर नेमका काय निष्कर्ष निघतो, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.हा प्रश्न निकाली लागल्यानंतर गावातील रस्त्यालगत झालेल्या अतिक्रमणांकडे ग्रामपंचायत प्रशासन काय भूमिका घेते ? या कडे आता सर्वसामान्य ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.**

ग्रामपंचायत कवठे येमाईच्या ताब्यात असलेल्यागावठाण नजीकच्या या सरकारी गायरान जमिनीवरून अनेक वर्षांपासून वाद सुरू आहे. या पार्श्वभूमीवर आज मंगळवार दि. २७ ला करण्यात आलेल्या शासकीय मोजणी दरम्यान परिसरातील बहुसंख्य शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते. सुमारे तीन तास ही मोजणी प्रक्रिया सुरू होती.

यावेळी ग्रामविस्तार अधिकारी तथा प्रशासक बी. आर. गावडे, ग्रामविकास अधिकारी पुनम थोरात चितळकर, ग्राम महसूल अधिकारी शलाका भालेराव,माजी ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब डांगे,सुभाष उघडे,अविनाश पोकळे,भाऊसाहेब घोडे अनेक ग्रामस्थ तसेच पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

ग्रामपंचायतीच्या म्हणण्यानुसार, गट क्रमांक ३२६ हा अष्टविनायक महामार्गाच्या अलीकडे उत्तरेकडे असून, संबंधित जमीन ग्रामपंचायतीच्या ताब्यात आहे. दुसरीकडे, अतिक्रमणधारकांच्या म्हणण्यानुसार महाम ार्गाच्या पलीकडील (उत्तरेकडील) काही मीटर जागेवरही त्यांचा हक्क आहे. त्यामुळे या जमिनीच्या नेमक्या हद्दीवरून दीर्घकाळापासून संभ्रम आणि वाद निर्माण झाला आहे.

# दौंड तालुक्यात काकडा आरतीचे स्वर ; पहाट विठ्ठलभक्तीने मंगलमय

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**यवत :** उठा पांडुरंगा आता, दर्शन द्या सकळा ! या आर्त सादेने दौंड तालुक्यातील पहाट प्रसन्न होत आहे. टाळ मृदंगाचा निनाद, अभंगांचे मंजुळ स्वर आणि मुखातून उमटणारा विठ्ठलनामाचा गरज अशा भक्तिमय वातावरणात दौंड तालुक्यातील गावोगावी काकडा आरती सोहळा रंगत आहे. पहाटेच्या कोवळ्या प्रहरी लाडक्या पांडुरंगाला जागवताना भाविकांच्या मनात भक्तिभाव दाटून येत आहे. जणू काही अवघा दौंडच विठुरायाच्या नामरंगात रंगून गेला आहे.

पवित्र कार्तिकी महिना सुरू झाल्याने तालुक्यातील विविध मंदिरांमध्ये पहाटेच्या काकडा आरतीला मोठ्या उत्साहात सुरुवात झाली असून, संपूर्ण परिसर विठ्ठलभक्तीने मंगलमय झाला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही कार्तिक महिन्याचे औचित्य साधून दौंड शहर, पाटस, कुरकुंभ, यवत, केडगाव आणि भीमा नदीकाठच्या गावांमधील मंदिरांमध्ये पहाटे विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्तींची विधीवत पूजा आणि काकडा आरती केली जात आहे. कडाक्याच्या थंडीची चाहूल लागली असून या थंडीची पर्वा न करता बालकांपासून ते वृद्धांपर्यंतचे भाविक पहाटे ५ वाजल्यापासूनच मंदिरांम ध्ये हजेरी लावत आहेत. टाळ-मृदंगाचा गजर, वीणेचा झंकार आणि सोबतीला पुंडलिक वरदे हरी विठ्ठल... चा नामघोष यामुळे पहाटेचे वातावरण अत्यंत प्रसन्न आणि सात्विक बनले आहे.

# पूर्व आंबेगावात वृक्षतोडीचा धुमाकूळ., वनविभागाचे दुर्लक्ष?

**लोणी धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील अनेक गावांमध्ये खासगी व गायरान जमीनीवरील वृक्षतोड मोठ्या प्रमाणात होत असल्याचे चित्र दिसत आहे. या वृक्षतोडीकडे वनविभागाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. एकीकडे वनविभागाकडून दरवर्षी 'झाडे लावा, झाडे जगवा' हा संदेश देत वृक्षसंवर्धनाचे आवाहन केले जाते; मात्र दुसरीकडे मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत असल्याने या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील विविध गावांमध्ये खासगी व गायरान जमीनीवरील झाडे तोडली जात आहेत. लाकूड व्यावसायिकांकडून वृक्षतोड करून लाकडाची वाहतूक केली जात आहे. काही वाहनांवर नंबर नसल्याचे सांगितले जात असून, अशा वाहनांमधून होणाऱ्या लाकूड वाहतुकीची तपासणी केली जाते का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

**वृक्षतोडीसाठी कायदेशीर परवानगी घेणे आवश्यक आहे विनापरवाना वृक्ष तोड झाल्याचे आढळून आल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाईल**
**-विकास भोसले - वनपरिक्षेत्र अधिकारी मंचर.**

# पुणे जिल्ह्यात रॅपिडो बाइक टॅक्सीचा वापर करू नये

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** रॅपिडो कंपनीने पुणे जिल्ह्यात बाइक टॅक्सी सेवा सुरू करण्यासाठी आवश्यक ॲग्रीगेटर परवाना प्राप्त केलेला नसल्याचे निर्दशनास आले आहे. परवान्याविना बाइक टॅक्सी सेवा सुरू ठेवल्याप्रकरणी प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्यामार्फत संबंधित कंपनीविरुद्ध १६ ऑक्टोबर २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे पुणे शहर व जिल्ह्यातील नागरिकांनी रॅपिडो बाइक टॅक्सी सेवेसाठी असलेल्या भ्रमणध्वनीवरील अनुप्रयोगाचा वापर करू नये, असे आवाहन पुणे व पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत करण्यात आले आहे. रॅपिडो कंपनीने बाइक टॅक्सी सेवेसाठी पुणे जिल्ह्याकरिता आवश्यक एकत्रीकारक परवाना घेतलेला नसतानाही पुणे शहरात व्यवसाय सुरू ठेवल्याचे निर्दशनास आले होते. या पार्श्वभूमीवर ९ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी तथा प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली.

# सासवडला नवरात्री निमित्त नऊ महिलांना नऊदुर्गा पुरस्कार देवून सन्मान

**नितीन यादव । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** आयुष्य जगत असताना आलेल्या संकटावर मात करत जिद्दीने उभ्या राहणाऱ्या नऊ महिलांना नवदुर्गा पुरस्कार देऊन सासवड येथे झालेल्या कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले.गेली पाच वर्षे सातत्याने हा उपक्रम राबवणाऱ्या स्व एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. येथील लक्ष्मी सभागृहात संपन्न झालेल्या कार्यक्रमास नेवासा येथील स्वामी समर्थ शुगर मिलच्या मॅनेजिंग डायरेक्टर डॉ ममता विजय शिवतारे-लांडे, सासवडचे सहाय्यक पोलीस निरीक्षक वैभव सोनावणे व पुणे येथील परिवर्तन सामाजिक संस्थेचे समीर जाधवराव प्रमुख अतिथी म्हणून हजर होते.पुरस्कारार्थी सर्व महिलांना शाल, सन्मानपत्र व शफी पठाण लिखित तुकाराम हे



पुस्तक देऊन गौरवण्यात आले

डॉ वृषाली जगताप, सीमा साळवे, विजयमाला पवार, उज्वला बांदल, विद्या जाधव, पुजा गायकवाड, स्नेहा धुमाळ, कल्पना जगताप, व शालन कावडे यांना त्यांच्या संघर्ष कहाणी बद्दल नवदुर्गा पुरस्कार देण्यात आला. याच वेळी अमृता जगताप -ताकवले यांनी पीएचडी पदवी मिळाल्यामुळे व एकोणीस वर्षाखालील राष्ट्रीय क्रिकेट संघात निवड झालेल्या श्रेया धुमाळ यांचा देखील विशेष सन्मान करण्यात आला. डॉ वृषाली जगताप व विद्या जाधव यांनी सत्काराला उत्तर देत प्रतिष्ठानचे ऋण मानले

प्रमुख मनोगतात डॉ ममता शिवतारे यांनी अगदी अचूक व बारकाईने निरीक्षण करून प्रतिकूल परिस्थितीतुन पुढे आलेल्या म हिलांच्या या सन्मानाबद्दल आनंद व्यक्त करत प्रतिष्ठानचे कौतुक तर पुरस्कारार्थी महिलांचे अभिनंदन केले. पुरुषांपेक्षा स्त्री वर निर्मितीची जबाबदारी अधिक आहे अशा परिस्थितीत समाजात वावरणाऱ्या महिलांचा कायम सन्मान झाला पाहिजे अशी भावना त्यांनी मांडली.

# दुष्काळ जाहीर झालेल्या ३०४ तालुक्यांतील प्रत्येक गावात किमान १०० जलशोषक खड्डे

## मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** राज्यातील खरीप हंगामात ट्रिगर-१ (प्रथम कळ) आणि ट्रिगर-२ (दुसरी कळ) लागू झालेल्या ३०४ तालुक्यांतील प्रत्येक गावात किमान १०० जलशोषक खड्डे तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिली. या तालुक्यांमध्ये मृद व जलसंधारणाची विविध कामेही हाती घेण्यात येणार आहेत. अपुरा पाऊस आणि दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मृद व जलसंधारण विभागाने याबाबत शासन निर्णय जारी केला आहे.

विभागाच्या योजनांतील प्रगतिपथावरील आणि अपूर्ण कामे पूर्ण करण्यासह जलसंधारण संरचनांच्या दुरुस्तीला प्राधान्य देण्यात येणार आहे. सर्व बंधाऱ्यांवर गेट किंवा फळ्या बसवून पाणी अडविणे, नादुरुस्त कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांची दुरुस्ती करून नीडल बसविणे, जलसाठ्यांतील गाळ काढणे, नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरण, वनराई बंधारे उभारणे तसेच बंधारे, तलाव आणि नाला खोलीकरणाच्या ठिकाणी रिचार्ज शाफ्ट तयार करण्यात येणार आहेत. शासकीय व खासगी इमारतींवर पर्जन्यजल संचयन संरचना उभारण्याचाही यात समावेश आहे. स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून होणाऱ्या कामांची प्रभावी अंमलबजावणी केली जाणार आहे.या कामांसाठी जलयुक्त शिवार अभियान २.०, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.०, जिल्हा नियोजन निधी, विविध घटक व उपयोजना, खनिज विकास निधी, खासदार व आमदार निधी, कॉर्पो रेट सामाजिक उत्तरदायित्व निधी, रोजगार हमी योजना आणि अन्य उपलब्ध शासकीय निधीचा वापर करण्यात येणार आहे. रोजगार हमी योजना किंवा व्हीबी जी राम जी योजनेच्या निधीतून जास्तीत जास्त कामे हाती घेण्यास प्राधान्य दिले जाणार आहे.

दुरुस्तीची कामे निवडताना जलदर्पण ॲपवरील अद्ययावत माहितीची पडताळणी केली जाणार आहे. प्रचलित आर्थिक मापदंडाच्या २० टक्के मर्यादेतील आणि २५ लाख रुपयांपेक्षा कमी खर्चाच्या दुरुस्ती कामांना मंजुरी देण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना राहतील. सर्व कामांचे जिओ-टॅगिंग करून संबंधित योजनांच्या पोर्टलवर माहिती अद्ययावत करावी लागणार आहे. जिल्ह्यातील कार्यकारी अभियंत्यांनी अधीक्षक अभियंत्यांमार्फत कामांचा गोषवारा दर १५ दिवसांनी शासनाला सादर करावा, असेही शासनाने स्पष्ट केले आहे.

# दिव्यांग विद्यार्थ्यांच्या स्वावलंबनासाठी शिक्षण विभाग कटिबद्ध

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वाघोली :** दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये अनेक सुप्त क्षमता असून, योग्य मार्गदर्शन व आवश्यक सहाय्यक साधने मिळाल्यास ते स्वावलंबी होऊ शकतात, असे प्रतिपादन हवेलीचे गटशिक्षणाधिकारी हेमंतकुमार खाडे यांनी केले.पुणे जिल्हा परिषद, पंचायत समिती हवेली शिक्षण विभाग व समावेशित शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच आलिम्को व फियाट कंपनीच्या सीएसआर उपक्रमांतर्गत सोलापूर बाजार येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मॉडेल हायस्कूलमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी साहित्य मोजमाप व तपासणी शिबिर घेण्यात आले. शिबिरात हवेली तालुक्यातील ८१ दिव्यांग विद्यार्थ्यांची तपासणी व मोजमाप करण्यात आले.

पात्र विद्यार्थ्यांना व्हीलचेअर, कॅलिपर, कमोड चेअर, टीएलएम किट, श्रवणयंत्र आदी आवश्यक साहित्य मोफत देण्यात येणार असून, साहित्य प्राप्त होताच त्याचे वितरण केले जाणार असल्याची माहिती सीएसआर प्रमुख अमोल फटाले यांनी दिली.

# भीमाशंकर अभयारण्यात पुनर्वसन की पर्यावरण संवर्धन?

## विकासाच्या नावाखाली निसर्गाचा समतोल धोक्यात येऊ नये -धनंजय कोकणे मानद वन्य जीव रक्षक पुणे

**नवनाथ फलके । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** शिरूर नगरपरिषदेच्या राजकारणात नव्या घडामोडींना वेग आला असून शहराचा विकासाचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवत शिरूर नगरपरिषद भारतीय जनता गट सत्तेत सहभागी होवून पाठिंबा देत असल्याचे पत्र गटनेते नितीन पाचर्णे यांनी शिरूर शहर नगरपरिषद गटाच्या गटनेता व नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे यांना दिल्याने स्थानिक राजकीय समीकरणांना नवे वळण मिळाले आहे.मात्र या महत्त्वपूर्ण घडामोडीच्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष गटाचे उपनगराध्यक्ष व नगरसेवक अनुपस्थित राहिल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले असून नगरपरिषदेतील पुढील राजकीय हालचालींकडे शिरूरकरांचे लक्ष लागले आहे.

**भीमाशंकर परिसरातील विकास आराखडा तयार करताना येथील समृद्ध जैवविविधता, घनदाट जंगल, वन्यजीव आणि पर्यावरणीय संवेदनशीलतेचा प्राधान्याने विचार होणे आवश्यक आहे. विकासाला विरोध नाही; मात्र विकासाच्या नावाखाली निसर्गाची हानी होता कामा नये. भीमाशंकरचा विकास हा निसर्गाचे वैभव जपणारा, पर्यावरणपूरक आणि भावी पिढ्यांचे भविष्य सुरक्षित करणारा असावा**
**-ॲड. महेश लक्ष्मणराव काळे**

**शेकरू हा डिसेंबर ते जानेवारी महिन्यात प्रजनन करतो तसेच तो प्रत्येक वर्षी प्रजनन करेल असे काही नाही यामुळे शेकरूंची संख्या झपाट्याने वाढत नाही मात्र भीमाशंकर अभयारण्य हे शेकरूच्या प्रजननासाठी तसेच जतनासाठी सुरक्षित अभयारण्य असल्याने या ठिकाणी शेकरूचे चांगल्या प्रकारे वाढ होताना पाहावयास मिळते. शेकरूची मादी ही सहजासहजी एकाच बछड्याला जन्म देते यामुळे देखील शेकरूची संख्या मर्यादित असते. मात्र जर अभयारण्यामध्येच मनुष्यवस्ती वसविण्यात आली तर त्या ठिकाणी ध्वनी प्रदूषण, सण उत्सवामुळे होणारे प्रदूषण व अवस्था मानवी हस्तक्षेप यामुळे महाराष्ट्राचे मानचिन्ह असणारे शेकरू या या संरक्षित प्राण्याचे संगोपणावर विपरीत परिणाम होईल.**
**- धनंजय कोकणे मानद वन्यजीव रक्षक पुणे**

शिरूर शहराचा वाढता विस्तार आणि नागरिकांच्या प्रलंबित नागरी समस्यांच्या पार्श्वभूमीवर दोन्ही गटांनी एकत्रितपणे काम करण्याची भूमिका मांडली आहे. शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, भुयारी गटार योजना आणि वाहतूक कोंडी यांसारखे प्रश्न मार्गी लावण्याबरोबरच विकासकामांना गती देण्याचा निर्धार यावेळी सर्वांकडून व्यक्त करण्यात आला. शहराच्या हिताला प्राधान्य देणार असल्याचे नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे यांनी स्पष्ट करत गटनेते नितीन पाचर्णे यांनी विकासाच्या वाटचालीत विश्वास दाखवत पाठिंबा दिल्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.नगरपरिषदेतील सर्व घटकांना विश्वासात घेऊन आणि सर्वांना सोबत घेऊन शिरूर शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचेही नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे यांनी सांगितले. नगरसेवक तथा गटनेते नितीन पाचर्णे यांनी शहराचा सर्वांगीण विकास आणि नागरिकांचे हित लक्षात घेऊन सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले.जिल्ह्याचे नेते प्रदीप कंद आणि तालुक्याचे नेते राहुल पाचर्णे यांच्या मार्गदर्शनाखाली हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे यांनी नगरपरिषदेच्या कामकाजात नेहमीच सहकार्याची भूमिका घेतल्याने आता एकत्रितपणे शहराच्या विकासासाठी काम करण्याचा निर्धार गटनेते नितीन पाचर्णे यांनी व्यक्त केला. केंद्र आणि राज्यातील सत्ताधारी पक्ष नगरपरिषदेतही एकत्र आल्याने शासनाच्या विविध योजनांचा लाभ शिरूर शहराला मिळवून देणे, विकासकामांसाठी निधी उपलब्ध करणे आणि प्रलंबित प्रश्न मार्गी लावणे, ही या नव्या राजकीय समीकरणाची प्रमुख आव्हाने असणार आहेत. शहरातील मूलभूत सुविधांचा प्रश्न सोडवून नागरिकांना दिलासा देण्यात ही एकजूट कितपत यशस्वी ठरते, हे आगामी काळात स्पष्ट होईल. दरम्यान, या घडामोडीच्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरदचंद्र पवार गटाचे उपनगराध्यक्ष आणि नगरसेवक अनुपस्थित असल्याने त्यांच्या भूमिकेबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.त्यांच्या अनुपस्थितीमागील कारण स्पष्ट झालेले नसल्याने त्याबाबत तर्कवितर्कांना अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. एकीकडे विकासाच्या मुद्द्यावर नव्या राजकीय समीकरणाची बांधणी होत असताना, दुसरीकडे या बदलाचा नगरपरिषदेच्या कारभारावर आणि शिरूरच्या आगामी राजकारणावर काय परिणाम होणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## द•ख•ल



### जामखेड वकील संघाच्या वतीने ॲड. सचिन घुमरे यांचा सत्कार संपन्न

**जामखेड :** ए.डी.सी.सी. बँकेच्या संचालक पदी निवड झाल्याबद्दल जामखेड वकील संघाच्या वतीने ड. सचिन घुमरे यांचा भव्य सत्कार सोहळा नुकताच आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात वकील बांधवांच्या शेती व आर्थिक अडचणी सोडवण्यासाठी बँकेकडून पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन नवनिर्वाचित संचालक ॲड. सचिन घुमरे यांनी दिले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला वकील संघाचे अध्यक्ष ड. हर्षल डोके यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी त्यांनी, वकील संघातील बरेच वकील हे शेतकरी कुटुंबातून आलेले आहेत. त्यांना अडचणीच्या काळात बँकेकडून सुलभ कर्ज उपलब्ध करून द्यावे आणि वकील सदस्यांना सर्वतोपरी सहकार्य करावे, अशी मागणी ड. सचिन घुमरे यांच्याकडे केली. या प्रसंगी ॲड. कोल्हे, ॲड. बोरा, ॲड. पारे, ॲड. गोले, ॲड. काशिद आणि ॲड. निकम पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करून नवनिर्वाचित संचालकांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास ॲड. हर्षल डोके. ॲड. राळेभात, ॲड. लटपटे, अँड सपकाळ तसेच ॲड. जायभय, ॲड. अनिल बारवकर, ॲड. कारंडे, ॲड. थोरात, ॲड. ढाळे, ॲड. नवनाथ घुमरे यांच्यासह मोठ्या संख्येने ज्युनियर व वरिष्ठ वकील सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. कोरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन ॲड. आमिर पठाण यांनी मानले.

### स्वरा पायमोडे हिचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश



**टाकळी ढोकेश्वर :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टाकळी ढोकेश्वर शाळेची विद्यार्थिनी कु.स्वरा प्रशांत पायमोडे हिने महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करून शिष्यवृत्ती मिळविली आहे. या यशाबद्दल तिचा जिल्हा परिषद शाळेच्या वतीने पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.या परीक्षेसाठी स्वरा हिला जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र ठुबे, वर्गशिक्षक बाबाजी नवले व जयश्री गाडेकर तसेच विनायक विद्या मंदिर पारनेर या शाळेचे शिक्षक प्रवीण साळवे यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. स्वरा ही टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर पतसंस्थेचे व्यवस्थापक प्रशांत पायमोडे यांची कन्या असून तिने मिळविलेल्या यशाबद्दल तिचे अनेक मान्यवरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

### समर्थ नर्सिंग महाविद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम



**पारनेर :** समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग, जी.एन.एम. महाविद्यालय, बंगरवाडी-बेल्हे येथील प्रथम वर्ष जी.एन.एम. (२०२५-२६) परीक्षेत विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केल्याची माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्य ऐश्वर्या गटकळ यांनी दिली. या परीक्षेत मोहिनी लोणके हिने ४०० गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला, तर पूर्वा शेळके हिने ३९७ गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला. माधुरी गाडेकर, काजल कसबे आणि प्रतीक्षा दाभाडे यांनी प्रत्येकी ३८७ गुण मिळवत संयुक्तपणे तृतीय क्रमांक मिळवला. या यशामुळे महाविद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. या परीक्षेत वैष्णवी आनंदराव, रुपाली हिंगे, अंकिता अग्रे, दिशा पोखरकर, साक्षी आधारी, या विद्यार्थ्यांनीही परीक्षेमध्ये विशेष प्राविण्य मिळविले आहे.गुणवंत विद्यार्थिनींच्या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके माजी जिल्हा परिषद सदस्य स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर राजीव सावंत, प्रशासकीय अधिकारी प्रा प्रदीप गाडेकर, यशवंत फापाळे यांनी सर्व गुणवंत विद्यार्थिनींचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थिनींनी मिळवलेले यश हे त्यांच्या मेहनतीचे, शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे आणि संस्थेने शैक्षणिक गुणवत्तेसाठी केलेल्या प्रयत्नांचे फलित आहे.

### पानोलीच्या स्वरा चौरेची इस्त्रो शैक्षणिक सहलीसाठी निवड

**पारनेर :** विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाची आवड निर्माण व्हावी, संशोधनवृत्ती वाढावी आणि स्पर्धा परीक्षांची गोडी लागावी, या उद्देशाने



जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या इस्रो शैक्षणिक सहलीसाठी पानोली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची विद्यार्थिनी स्वरा रामदास चौरे हिची निवड झाली आहे. या परीक्षेत गुणवत्तापूर्ण कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना केरळ येथील थुंबा येथील डॉ. विक्रम साराभाई स्पेस सेंटरला भेट देण्याची संधी मिळते. विद्यार्थ्यांना अवकाश संशोधनाची माहिती मिळावी आणि त्यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी स्वराने उल्लेखनीय यश संपादन करत इस्रो सहलीसाठी आपले स्थान निश्चित केले आहे. तसेच शाळेचे मुख्याध्यापक रमजान शेख, काशिनाथ खेडकर, संगीता लोंढे, सुवर्णा दिवटे, छाया मापारी आणि शुभांगी काळोखे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. पालक प्रिया चौरे यांनीही तिला सातत्याने प्रोत्साहन दिले. स्वराच्या या यशाबद्दल पानोली गावचे ज्येष्ठ नागरिक कॉ. नारायणराव गायकवाड, सरपंच संदीपशेठ गाडेकर, तुकाराम वाखारे, डॉ. रामचंद्र थोरात, दादाभाऊ वारे, आबासाहेब गायकवाड, राजेंद्र गायकवाड, नवनाथशेठ खामकर, रामदास थोरात यांच्यासह समस्त ग्रामस्थांनी तिचे अभिनंदन केले. पारनेर तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी तेजस्विनी पवार, विस्ताराधिकारी विनेश लाळगे तसेच केंद्रप्रमुख उज्वला कोल्हे आणि अमोल दळवी यांनीही स्वराचे कौतुक करून तिला इस्रो शैक्षणिक सहलीसाठी शुभेच्छा दिल्या.

# पारनेरात दुष्काळात लाखो लिटर पाणी रस्त्यावर!

## पारनेरकर थेंबा-थेंबासाठी व्याकुळ, तर ठेकेदाराची टँकरने उधळपट्टी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**पारनेर :** एकीकडे पारनेर शहराला आठवडा आठवडा नळाला पाणी नाही, महिला हंडाभर पाण्यासाठी संघर्ष करत आहेत आणि दुसरीकडे शहरातच हजारो लिटर पाणी रोज रस्त्यावर ओतले जात आहे. दुष्काळाने होरपळणाऱ्या पारनेरात धूळ उडू नये या नावाखाली पाण्याची अशी उधळपट्टी सुरू असल्याने नागरिकांत संतापाची लाट उसळली आहे. प्रशासनाला दुष्काळाचे गांभीर्य आहे का, असा सवाल आता नागरिक विचारू लागले आहेत.

देवीभोयरे फाटा ते खडकी-खंडाळा रस्त्याचे काम सुरू असून पारनेर परिसरात हे काम गेल्या काही दिवसापासून सुरू आहे पारनेर शहरानजीक बाजारपेठेपर्यंत सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम सुरू आहे. या कामावर धुरळा उडू नये, या कारणाखाली दिवसातून ४ ते ५ वेळा टँकरद्वारे अमर्याद पाणी मारले जात आहे.

गरजेपेक्षा जास्त पाणी मारल्याने रस्त्यावर अक्षरशः पाणी साचत आहे. ठिकठिकाणी चिखलाचे साम्राज्य झाले असून दुचाकीस्वार, पादचाऱ्यांना या चिखलातून वाट काढताना कसरत करावी लागत आहे. धूळ थांबवायला पाणी मारणे ठीक, पण पाणी साठून चिखल होईपर्यंत पाणी मारणे हा निव्वळ पाण्याचा अपव्यय असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

राज्यात सर्वत्र दुष्काळी परिस्थिती आहे, पारनेर तालुकाही त्याला अपवाद नाही.

**दुष्काळात पाण्याचा अपव्यय थांबवा व धुळीला रोखा!**

पारनेर शहरात जवळ रस्त्याचे काम सुरु असल्याने धुराळा उडत आहे मात्र ही धूळ थोपवण्यासाठी अमर्याद पाण्याचा वापर करणे कितपत योग्य आहे धुळीसाठी योग्य नियोजन करून मर्यादित पाण्याचा वापर केल्यास व्यावसायिकांना देखील धुळीचा त्रास होणार नाही व अमर्याद पाण्याचा वापर टाळता येईल यासाठी ठेकेदार प्रशासन यांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

शहराला भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. काही दिवसांपूर्वी झालेल्या पालकमंत्र्यांच्या बैठकीत नगरपंचायत प्रशासनाने औद्योगिक वसाहतीतून (चखऊ) टँकरद्वारे पाणी द्यावे, अशी मागणी केली होती. मात्र, औद्योगिक विभागाने त्याला सकारात्मक प्रतिसाद दिलेला नाही. अशी भीषण परिस्थिती आहे. दुष्काळाचे गांभीर्य ओळखून संबंधित ठेकेदाराला तातडीने समज द्यावी आणि पाण्याचा अपव्यय थांबवून ते पाणी नागरिकांसाठी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. पारनेरच्या शहराजवळ पुणेवाडी फाटा ते पारनेर या परिसरात रस्ता काँक्रिटीकरण काम सुरू आहे त्या कामावर मुबलक पाणी मारले जात नाही तर धुराळा उडू नये म्हणून मोठ्या प्रमाणात पाण्याची नासधुस केली जाते जिथे गरज तिथे पाणी नाही आवश्यकता नाही तिथे पाण्याचा अपव्यय होत आहे.

## पाणी पुरवठा विहीरीचे पाणी स्वच्छ की अस्वच्छ यावर वाद करीत पुढाऱ्यांनी ठेवले गावाला पाण्यापासून वंचित

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**निघोज :** पारनेर तालुक्यातील जवळा परिसर हा कुकडी डावा कालव्याने समृद्ध असला तरी आज मात्र गावाला नळपाणी पुरवठा हा सातत्याने न होता कधीतरी नळाला पाणी येत असल्याने ग्रामस्थ व महिला भगिनी हतबल झाल्या आहेत. मात्र गेली अनेक वर्षांपासून नळ पाणीपुरवठा योजनेला पाणी पुरवणारी विहीर मात्र सहापरस आहे आणी प्रत्यक्षात जवळा व परिसरात पिण्याच्या पाण्याची टंचाई असूनही या विहीरीला मात्र चार परस पाणी आहे.

मात्र गणपती विसर्जन, देवी विसर्जन व निर्माल्य टाकून लोकांनी या विहीरीचे पाणी दुषीत केले आहे. तशातच या दुषीत पाण्याचे रोगराई होईल अशी अफवा पसरवून ग्रामपंचायत मधील सत्ताधारी पार्टीच्या विरोधकांनी या विहीरीचे पाणी वापरु नका म्हणून खोटा नाटा प्रचार करीत सत्ताधाऱ्यांना आत्तापासूनच नामोहरम केले आहे.

जेणे करुन पाहा आपला परीसर कुकडी डावा कालव्याने समृद्ध आहे मात्र गावात पाऊसळ्यातच पाणी टंचाई झाली आहे असा संदेश लोकांपर्यंत गेला पाहिजे हा विरोधी पुढाऱ्यांचा कांगावा असल्याचा आरोप सत्ताधारी करीत आहेत. मात्र या विहीरीचे पाणी दुषीत आहे कि नाही याचा साक्षमोक्ष तहसीलदार यांनीच लावून द्यावा अशाप्रकारचे निवेदन ग्रामपंचायत सत्ताधारी यांनी दिले असून पिण्याच्या पाण्याची टंचाई लक्षात घेता तहसीलदार यांनी जवळा येथे तातडीने येऊन या विहीरीची पाहाणी करुन हे पाणी पिण्यासाठी योग्य की अयोग्य याचा अहवाल देऊन गावातील पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी कार्यक्षमपणे भुमिका घ्यावी अशी चर्चा जवळा परिसरात सुरू आहे.

## जेन झी चळवळीचे जनक ढाकणे यांच्या समर्थकांची पुतळा अनावरणाची भावनिक साद

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** ऊस तोडणी कामगार संघटनेचे संस्थापक, माजी केंद्रीय मंत्री स्व .बबनराव ढाकणे यांच्या पूर्ण कृती पुतळ्याच्या अनावरण प्रसंगी राज्य सरकारची अनास्था ढाकणे समर्थकांची अस्वस्थता वाढवणारी ठरत आहे कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांना सरकारकडून राजकीय दृष्टीने बघितले गेल्याने ढाकणे यांचीच नव्हे तर त्यांच्या विचारांची सुद्धा हेळसांड सुरू झाली आहे. ज्या नेत्याने सर्वसामान्य माणसाला संघर्ष करायला शिकवले त्या नेत्याचा पुतळा बंदिस्त अवस्थेत अच्छादनाखाली उभा आहे. राजाच्या जडणघडणीमध्ये ज्या नेत्यांचे योगदान लाभले त्यांच्याविषयी अनादराची भावना संताप जनक आहे. राज्यातील जेन झी चळवळीचे जनक बबनराव ढाकणे होते. याचा अभ्यास राज्यकर्त्यांकडून होणे अपेक्षित आहे. राज्याच्या राजकारणात चार दशकांहून अधिक काळ प्रस्थापितांबरोबर लढताना ढाकणे यांनी स्वतःच्या विचारांची पिढी तयार केली. गल्लीचे नाव दिल्लीपर्यंत सर्वप्रथम ढाकणे यांनी नेत ओबीसी नेतृत्वाची ताकद दाखवून दिली. राजकीय दृष्ट्या अनेक स्थित्यंतरे त्यांनी जीवनात पाहिली. सत्ता व ढाकणे असे समीकरण राज्यात काही काळ राहिले. राज्याच्या राजकारणातील सध्याचे बरेच नेते त्यांच्याच माठातील पाणी पिऊन सार्वजनिक जीवनात सक्रिय झाले. जिवंतपणी अनेकांनी या नेत्याला झाकण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. त्यांच्या मृत्यूनंतर मात्र त्यांच्या नशिबी आच्छादना बाहेर येण्यासाठी समर्थकांच्या धावपळीकडे लक्ष द्यायला आज कोणाला वेळ नाही ही दुर्दैवी गोष्ट आहे.

## ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरला रेडियम बंधनकारक!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**श्रीगोंदा :** साखर कारखान्यांचा गाळप हंगाम सुरू होताच ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. रात्रीच्या वेळी रिफ्लेक्टरअभावी होणारे अपघात रोखण्यासाठी श्रीगोंदा पोलिसांनी आता कडक भूमिका घेतली आहे. ऊस वाहतूक करणाऱ्या प्रत्येक ट्रॅक्टर आणि ट्रॉलीच्या मागील बाजूस रेडियम व रिफ्लेक्टर बसविणे बंधनकारक करण्याचे निर्देश पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांनी तालुक्यातील साखर कारखान्यांना दिले आहेत. तसेच ट्रॅक्टरमध्ये गाण्यांचे टेप लावू नयेत, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत.

श्रीगोंदा, दौंड आणि कर्जत तालुक्यांतून मोठ्या प्रमाणावर ट्रॅक्टरद्वारे ऊस वाहतूक केली जाते. जामखेड-न्हावरा आणि दौंड-अहिल्यानगर या प्रमुख मार्गांवर वाहनांची मोठी वर्दळ असते. अशा परिस्थितीत रात्रीच्या वेळी रिफ्लेक्टर नसलेले ट्रॅक्टर आणि ट्रॉली इतर वाहनचालकांच्या सहज नजरेस पडत नाहीत. त्यामुळे गंभीर अपघात होऊन जीवितहानी होण्याचा धोका वाढतो. यापूर्वीही अशा अपघातांत मनुष्यहानी झाल्याच्या घटना घडल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर श्रीगोंदा पोलिसांनी संबंधित साखर कारखान्यांच्या व्यवस्थापकांना पत्र पाठवून तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. कारखान्यांनी ऊस वाहतूक करणारे ट्रॅक्टरमालक आणि चालक यांची बैठक घेऊन वाहतुकीच्या नियमांबाबत जनजागृती करावी. तसेच ट्रॅक्टर व ट्रॉलीच्या मागील बाजूस आवश्यक रेडियम आणि रिफ्लेक्टर बसविण्याची खात्री करावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

ऊस वाहतूक अपघातमुक्त करण्यासाठी साखर कारखान्यांनी स्वतःच्या स्तरावर तातडीची मोहीम राबवून केलेल्या उपाययोजनांची माहिती पोलिसांना द्यावी, असेही निर्देश आहेत. वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन किंवा निष्काळजीपणा आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांनी दिला आहे.

रिफ्लेक्टरचा छोटासा खर्च, पण निष्काळजीपणाची मोठी किंमत जीवावर बेतू शकते. त्यामुळे ऊस वाहतूकदार, चालक आणि साखर कारखान्यांनी सुरक्षिततेला प्राधान्य देण्याची गरज आहे.

## चिचोंडीत सापडलेला मूकबधिर विद्यार्थी शिक्षकांकडे सुखरूप सुपूर्त

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**शिराळ चिचोंडी :** तालुक्यातील चिचोंडी येथे रविवारी दुपारपासून रडत असलेल्या एका मूकबधिर मुलाला स्थानिक पत्रकाराच्या तत्परतेमुळे आणि सोशल मीडियाच्या प्रभावी वापरामुळे सुरक्षितपणे त्याच्या विद्यालयातील शिक्षकांकडे सुपूर्त करण्यात आले आहे.

ग्रामस्थांनी दाखवलेली सतर्कता आणि माहितीची देवाणघेवाण यामुळे हा मुलगा वाघोली येथील श्रीकृष्ण सेवाभावी मूकबधिर विद्यालयाचा विद्यार्थी असल्याचे स्पष्ट झाले.

रविवारी दुपारी सुमारे तीन वाजल्यापासून हा मुलगा चिचोंडी येथे एकटाच रडताना आढळला. मूकबधिर असल्यामुळे त्याला स्वतःची ओळख किंवा पत्ता सांगता येत नव्हता.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून चिचोंडीतील ग्रामस्थांनी तातडीने त्याचे छायाचित्र व माहिती सोशल मीडियावरील ग्रुप्सवर प्रसारित केली.

हा संदेश संबंधित विद्यालयापर्यंत पोहोचल्यानंतर तेथील शिक्षकांनी त्वरित चिचोंडी येथे धाव घेतली. या घटनेबाबत पाथर्डी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन कंडारे यांना माहिती देण्यात आली.

त्यानंतर पोलीस कर्मचारी संभाजी कुसळकर यांच्या उपस्थितीत मुलाला संबंधित शिक्षकांकडे सुखरूप सोपविण्यात आले.

ग्रामस्थांची सतर्कता आणि संवेदनशीलतेचे कौतुक

अडचणीत सापडलेल्या एका अनोळखी मुलाकडे दुर्लक्ष न करता चिचोंडीतील ग्रामस्थांनी त्याची ओळख पटविण्यासाठी पुढाकार घेतला.

सोशलमीडियाचासकारात्मक वापर, ग्रामस्थांची तत्परता आणि पोलीस व शिक्षकांच्या समन्वयामुळे बालकाला सुरक्षितपणे विद्यालयाच्या स्वाधीन करणे शक्य झाले. ग्रामस्थांच्या या सतर्कतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# भीमाशंकर वृक्षतोडीचा कर्जतच्या सर्व सामाजिक संघटनेकडून निषेध

## तहसीलदारांना निवेदन देत केला संताप व्यक्त

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**कर्जत :** भीमाशंकर (कर्जत जिल्हा रायगड) येथील एका प्रकल्पाच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झाली असून या घटनेचा कर्जतच्या सर्व सामाजिक संघटनेकडून निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी पर्यावरण श्रमप्रेमींनी तहसीलदार कर्जत यांना निवेदन देत निसर्ग ऱ्हासाचा संताप व्यक्त करीत शासन दरबारी आपल्या भावना मांडल्या. विकासाच्या नावाखाली होत असलेली निसर्गाची अपरिमित हानी खपवून घेतली जाणार नाही असा इशारा या श्रमप्रेमींनी निवेदनाद्वारे दिला.

कर्जत (जि. रायगड) आणि भीमाशंकर परिसरात टोरेंटो कंपनीच्या प्रस्तावित प्रकल्पासाठी जंगल परिसरात अनेक वर्षांपासून निसर्ग जतन असलेले वृक्षांची मोठ्या प्रमाणावर तोड सुरू असल्याची माहिती समोर येत आहे.

या वृक्षतोडीमुळे परिसरातील नैसर्गिक वनसंपदा, जैवविविधता, वन्यजीवांचे अधिवास तसेच पर्यावरणीय संतुलन धोक्यात येण्याची गंभीर शक्यता आहे. वास्तविक पाहता आम्ही पर्यावरण प्रेमी विकासाला विरोध करीत नाही. मात्र विकासाच्या नावाखाली निसर्गाची अपरिमित हानी होणे योग्य नाही. आणि ती खपवून देखील घेतली जाणार नाही. एकीकडे शासन वृक्ष लागवड करण्यासाठी जागृती करीत असताना दुसरीकडे अनेक वर्षांपासूनची निसर्ग संपत्तीचा ऱ्हास करीत विरोधाभास निर्माण करीत असल्याची भावना होत आहे. विकास आणि पर्यावरण संवर्धन यांचा समतोल राखणे ही काळाची गरज आहे.

जंगल ही केवळ झाडांची संख्या नसून असंख्य पशू-पक्षी, वनस्पती, औषधी वनस्पती आणि संपूर्ण परिसंस्थेचा आधार आहे. तसेच एकदा नष्ट झालेली नैसर्गिक वनसंपदा पूर्ववत होण्यासाठी अनेक दशके लागू शकतात. त्यामुळे भीमाशंकर जंगल परिसरातील टोरेंटो कंपनीच्या प्रकल्पासाठी सुरू असलेली कथित मोठ्या प्रमाणावरील वृक्षतोड तात्काळ थांबवून वनसंपदा व जैवविविधतेचे संरक्षण करावे अशी मागणी कर्जतच्या सर्व सामाजिक संघटनेच्या श्रमप्रेमींनी शासन दरबारी केली आहे. या आशयाचे निवेदन कर्जतचे तहसीलदार रवी सतवन यांना सोमवारी देण्यात आले.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

## फरार आरोपींची माहिती कळवा; आश्वी पोलिसांचे आवाहन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी |** आश्वी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या विविध गुन्ह्यांमध्ये तपासकामी पोलीसांना चकवा देणाऱ्या फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी आश्वी पोलिसांच्या वतीने धडक मोहीम राबविण्यात येत आहे. या फरार आरोपींची माहिती पोलिसांना कळवावी असे आवाहन आश्वी पोलिसांनी केले आहे. या मोहिमेअंतर्गत आश्वी पोलीसांना श्याम बालाजी पवार (रा. आश्वी खुर्द), लक्ष्मण भाऊसाहेब वर्पे (रा. राहुरी), सुमित शिवाजी बोंद्रे (रा. पिंप्री-लौकी), गणेश भाऊसाहेब नागरे (रा. खळी), अर्चना शिवाजी आंधळे (रा. पानोडी), सिध्देश भिमराज घुगे (रा. पानोडी) तसेच रवींद्र भगवंता दातीर (रा. खांबे) हे सात संशयित पोलीसांना हवे आहेत. चालू वर्षात आश्वी पोलिसांनी विविध गुन्ह्यांमधील तब्बल १० फरार आरोपींना जेरबंद करून गजाआड केले असल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांनी दिली. उर्वरित फरार आरोपींनाही लवकरच कायद्याच्या कचाट्यात पकडले जाईल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, या पार्श्वभूमीवर, नमूद फरार आरोपींबाबत कोणालाही काही गोपनीय माहिती मिळाल्यास त्यांनी तात्काळ आश्वी पोलीस ठाण्याशी संपर्क साधून पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांनी केले आहे. तसेच माहिती देणाऱ्या जागरूक नागरिकाचे नाव आणि ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल, अशी ग्वाहीदेखील पोलिसांनी दिली आहे.



## जामखेडच्या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी नगरपरिषद सरसावली

### टँकरने पाणीपुरवठ्यासाठी ठराव; भुतवडा तलावातून उपसा सुरू, उजनी योजनेला गती

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** जामखेड शहरासह उपनगरांतील विविध वाड्या-वस्त्यांमध्ये निर्माण झालेली पाणीटंचाई दूर करण्यासाठी नगरपरिषदेने उपाययोजना हाती घेतल्या आहेत. टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी शासनाकडे मागणी करण्याबाबत २८ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेत ठराव मांडण्यात येणार आहे. भुतवडा तलावातून पाणी उपसा सुरू करण्यात आला असून, देहिगाव (उजनी) ते जामखेड पाणीपुरवठा योजनेचे कामही गतीने पूर्ण करण्यासाठी प्रशासनाकडून पाठपुरावा सुरू आहे.



शहरातील आरोग्यवस्ती, कोल्हे वस्ती, खांडवी वस्ती, साकतपुळे वस्ती, तपनेश्वर परिसर, मिलिंदनगर, मोरे वस्ती, अहिल्या वस्ती आणि बारोट वस्ती यांसह विविध भागांत पाणीटंचाई जाणवत आहे. तसेच जांबवाडी, भुतवडा, लहानेवाडी, धोत्री, बेटवाडी, नानजवाडी आणि चोंडी या उपनगरांमध्येही पाण्याची समस्या गंभीर बनली आहे.

**भुतवडा तलावातून पाणी उपसा सुरू**

पाणीटंचाई कमी करण्यासाठी भुतवडा तलावातून पाणी उपसण्याची कार्यवाही सुरू झाली आहे. नगरपरिषदेच्या माध्यमातून पाच पाणबुडी मोटारींच्या साहाय्याने पाणी उपसले जात आहे. याशिवाय पाणीटंचाईग्रस्त भागांतील विहिरींचे खोलीकरण, गाळ काढणे आणि आवश्यकतेनुसार आडवे बोअर घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पुरेसे पाणी उपलब्ध असलेल्या विहिरी व बोअरवेल अधिग्रहित करून त्यांचा पाणीपुरवठ्यासाठी वापर करण्याची कार्यवाहीही प्रस्तावित आहे.

**उजनी योजनेचे काम दीड वर्षात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट**

जामखेडच्या पाणीप्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी देहिगाव (उजनी) ते जामखेड पाणीपुरवठा योजना महत्त्वाची ठरणार आहे. या योजनेसाठी जलशुद्धीकरण केंद्राची जागा निश्चित झाली असून, मनोज कुलकर्णी यांनी ही जागा नगरपरिषदेला विनामोबदला बक्षीसपत्राद्वारे दिली आहे. योजनेच्या कामासाठी आवश्यक वनविभागाच्या परवानगीसंदर्भात जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे पत्रव्यवहार सुरू आहे. पाणीपुरवठा वाहिनी शेतजमिनीतून जाणार असल्याने संबंधित शेतकऱ्यांशी समन्वय साधून अडचणी सोडविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पुढील दीड वर्षात योजना पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

विधान परिषदेचे सभापती प्रा. ना. राम शिंदे यांच्या मार्गदर्शनातून या कामाचा पाठपुरावा केला जात आहे. पाणीटंचाईच्या काळात राजकारण बाजूला ठेवून प्रशासन, लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटना आणि नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष प्रांजल चिंतामणी, उपनगराध्यक्ष, नगरसेवक आणि संबंधित पदाधिकारी उपस्थित होते.



## बिबट्याच्या बंदोबस्तासाठी वनमंत्री गणेश नाईक यांचे तातडीचे निर्देश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील गोधेगाव परिसरात बिबट्याच्या वाढत्या हल्ल्यांमुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या भीतीच्या पार्श्वभूमीवर आ. विठ्ठलराव लंघे यांनी वनमंत्री ना. गणेश नाईक यांची मुंबई मंत्रालय येथे प्रत्यक्ष भेट घेऊन परिस्थितीचे गांभीर्य त्यांच्या निदर्शनास आणून दिले. याची तातडीने दखल घेत वनमंत्र्यांनी अहिल्यानगर येथील वनपरिक्षेत्र अधिकारी (आरएफओ) यांना थेट दूरध्वनी करून परिस्थितीचा आढावा घेतला व बिबट्याच्या बंदोबस्तासाठी ठोस कार्यवाहीचे निर्देश दिले.

गोधेगाव येथे १५ ऑक्टोबर रोजी शेतमजूर सुरेश अहिरे यांचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत असून, त्यानंतरही परिसरात आणखी दोन ते तीन नागरिकांवर बिबट्याने हल्ले केल्याच्या घटना समोर आल्या आहेत. त्यामुळे शेतकरी, शेतमजूर व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सदर परिसरातील नागरिकांचा उदरनिर्वाह प्रामुख्याने शेती व शेतमजुरीवर अवलंबून आहे. मात्र, बिबट्याच्या सततच्या हल्ल्यांमुळे शेतकरी व शेतमजूर शेतात जाण्यास घाबरत असून, शेतीकामे व दैनंदिन जनजीवन विस्कळीत झाले आहे. विशेषतः महिला, लहान मुले व शेतात काम करणाऱ्या मजुरांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, आणखी जीवितहानी होण्याची भीती व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर आ. लंघे यांनी वनमंत्री नाईक यांच्यासमोर सर्व परिस्थिती मांडून बिबट्याचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी केली. याची त्वरित दखल घेत वनमंत्र्यांनी अतिरिक्त वन कर्मचारी व विशेष पथके तैनात करणे, आवश्यक ठिकाणी पिंजरे लावणे आणि बिबट्याची शोधमोहीम तीव्र करण्याचे आदेश दिले. नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाल्यास कायदेशीर तरतुदी व आवश्यक परवानग्यांनुसार बिबट्याला शूट करण्याच्या पर्यायाबाबतही निर्णय घेण्याच्या सूचना दिल्याचे आ. लंघे यांनी सांगितले.

तसेच मृत शेतमजुराच्या कुटुंबीयांना आर्थिक मदतीचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. नागरिकांच्या जीविताचे संरक्षण ही सर्वोच्च प्राथमिकता असून, संबंधित बिबट्याचा बंदोबस्त होईपर्यंत वन विभागाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येईल, असे आमदार विठ्ठलराव लंघे यांनी स्पष्ट केले.

## दुष्काळ निवारणाच्या 'कोपरगाव टास्क फोर्स' साठी संजीवनीच्या संचालकांकडून दुष्काळ निधी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** राज्यातील दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन दुष्काळग्रस्तांना मदत करण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांनी केले होते. अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाल्यानंतर सत्काराऐवजी दुष्काळग्रस्तांना मदत करण्याचे आवाहन त्यांनी केले. त्याला प्रतिसाद देत सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याच्या संचालकांनी ५१ हजार रुपयांचा दुष्काळनिधी मंगळवारी त्यांच्याकडे सुपूर्द केला.

यावेळी कारखान्याचे युवाध्यक्ष आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी दुष्काळाची गंभीर परिस्थिती मांडत कारखान्याच्या वतीने करावयाच्या उपाययोजना आणि दुष्काळ आराखड्याबाबत चर्चा केली. संचालक बाळासाहेब वक्ते यांनी प्रास्ताविक केले, तर उपाध्यक्ष ज्ञानेश्वर परजणे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.



बिपीनदादा कोल्हे म्हणाले, माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी १९७२ आणि १९८४ च्या दुष्काळात केलेले कार्य प्रेरणादायी आहे. त्या काळात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पशुधनासाठी चारा, गरिबांना धान्य आणि पाणी साठवणुकीसाठी टाक्यांचे वाटप करण्यात आले होते. याच अनुभवाच्या आधारे सध्याच्या संकटाचा सामना करण्यासाठी 'कोपरगाव टास्क फोर्स'ची निर्मिती करणे आवश्यक आहे.

२०२६ मधील एल निनोच्या प्रभावामुळे दुष्काळाचे संकट अधिक गंभीर झाले आहे. फेब्रुवारी-मार्चमध्ये कोरड्या पडणाऱ्या विहिरी ऑक्टोबरमध्येच तळ गाठत आहेत. त्यामुळे पाण्याचा काटकसरीने वापर करावा. संचालकांनी गावोगावी जाऊन धान्य गोळा करावे, तसेच पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता वाढवावी. चारा उत्पादनासाठी शेतकऱ्यांनी आतापासूनच नियोजन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी नगराध्यक्ष पराग संधान, संचालक त्र्यंबकराव सरोदे, आप्पासाहेब दवंगे, रमेश आभाळे, विलासराव माळी, तुळशीराम कानवडे यांच्यासह कारखान्याचे पदाधिकारी, शेतकरी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## पतसंस्थेत पैसे अडकल्याने कॅन्सरग्रस्त पतीचे उपचार रखडले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** ज्ञानेश्वरी मल्टीस्टेट पतसंस्थेत ठेवलेले नऊ लाख रुपये परत मिळत नसल्याने आणि आर्थिक अडचणींमुळे चौथ्या टप्प्यातील कॅन्सरग्रस्त पतींचे उपचार व्यवस्थित होत नसल्याने भारती आबासाहेब गवळी यांनी १ नोव्हेंबर २०२६ पासून आपला मुलगा, मुलगी, पती आणि सासूसह खरवंडी ग्रामपंचायतीसमोर अन्नत्याग करण्याचा इशारा दिला आहे.

**कुटुंबासह अन्नत्याग करणार!**

गवळी यांच्या म्हणण्यानुसार, पतसंस्थेत ठेवलेल्या नऊ लाख रुपयांपैकी आठ लाख रुपये अद्याप बाकी आहेत. याप्रकरणी शनी शिंगणापूर पोलीस ठाण्यात दोन-तीन वेळा अर्ज देऊनही ठोस कारवाई झाली नसल्याचा त्यांचा आरोप आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी आमदार विठ्ठलराव लंघे यांच्यासह पालकमंत्री आणि मुख्यमंत्र्यांकडेही मदतीसाठी अर्ज करून पाठपुरावा केला; मात्र अद्याप रक्कम मिळालेली नाही. पतींच्या कॅन्सरच्या उपचारांसाठी पैशांची अत्यंत आवश्यकता असून, आर्थिक अडचणींमुळे गेल्या दोन-तीन महिन्यांपासून उपचार करण्यात अडथळे येत असल्याचे भारती गवळी यांनी सांगितले. १ नोव्हेंबरपर्यंत संपूर्ण रक्कम मिळाली नाही, तर कुटुंबासह अन्नत्याग करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. या प्रकरणात ज्ञानेश्वरी मल्टीस्टेट पतसंस्थेचे संबंधित संचालक नाथाभाऊ मारुती पंडित, विकास विठ्ठल वाघ, विलास मुरलीधर खाटिक, शैलेंद्र झंकारमल सुरपुरिया, सलीम बशीरखा पठाण, संदीप दत्तात्रय खिल्लारी, भिकाजी नाथू भोगे, बाजीराव जनार्दन पंडित आणि ज्योती रंगनाथ भोगे यांच्या भूमिकेची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे. या प्रकरणाची खरवंडीचे सरपंच, ग्रामपंचायत प्रशासन, पोलीस पाटील आणि संबंधित पोलीस प्रशासनाने गांभीर्याने दखल घ्यावी. अडकलेली रक्कम मिळवून देण्यासाठी तातडीने कायदेशीर कार्यवाही करावी, अशी भारती गवळी यांची मागणी आहे.

## श्रीरामपूर पोलिसांच्या महिला सुरक्षितता उपक्रमाचे आदिती तटकरेंकडून कौतुक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव :** नवरात्रोत्सव २०२६ दरम्यान महिला व मुलींच्या सुरक्षिततेसाठी श्रीरामपूर विभागाच्या अपर पोलीस अधीक्षक कार्यालयाने राबविलेल्या विशेष उपक्रमाचे राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी कौतुक केले आहे. त्यांनी समाजमाध्यमावरील आपल्या खात्यावरून या उपक्रमाची दखल घेत जिल्हा पोलीस अधीक्षक आणि अपर पोलीस अधीक्षकांचे अभिनंदन केले.

श्रीरामपूर विभागातील १७ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत २०२५ आणि २०२६ या दोन वर्षांत महिला व मुलींवरील गंभीर गुन्ह्यांची माहिती संकलित करण्यात आली. त्यामध्ये बलात्काराचे २५१ आणि विनयभंगाचे ६६६, असे एकूण ९१७ गुन्हे दाखल असल्याचे समोर आले.

या गुन्ह्यांतील तक्रारदार महिलांशी संपर्क साधण्यासाठी महिला पोलीस उपनिरीक्षकांसह सात महिला कर्मचाऱ्यांचे पथक तयार करण्यात आले. या पथकाने संबंधित महिलांना दूरध्वनी करून पोलिसांच्या कारवाईबाबत समाधान आहे का, तसेच संबंधित आरोपींकडून पुन्हा त्रास, पाठलाग किंवा अन्य गैरप्रकार होत आहेत का, याची माहिती घेतली.

यापैकी ८४६ महिलांनी पोलिसांच्या कारवाईबाबत समाधान व्यक्त केले आणि सध्या आरोपींकडून त्रास होत नसल्याचे सांगितले. मात्र, ७१ महिलांनी अद्याप त्रास होत असल्याचे कळविले. या महिलांच्या तक्रारींची दखल घेऊन संबंधित आरोपींवर पुढील दहा दिवसांत प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार नव्याने गुन्हेही दाखल केले जाणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

महिलांच्या सुरक्षिततेसाठी तक्रारीनंतरही सातत्याने पाठपुरावा करण्याच्या या उपक्रमाची राज्यस्तरावर दखल घेतली गेल्याने श्रीरामपूर पोलिसांच्या कार्याचे कौतुक होत आहे. हा उपक्रम राज्यभर राबविण्यासाठी प्रेरणादायी ठरू शकतो.

## सोनेवाडीत ऊसतोड मजुरांच्या फडावर बिबट्याचा हल्ला !

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** तालुक्यातील सोनेवाडी येथील नगदवाडी परिसरात ऊसतोड मजुरांच्या फडावर बिबट्याने हल्ला केल्याची घटना मंगळवारी (दि. २७) सायंकाळी सातच्या सुमारास घडली. बिबट्या आपल्या दिशेने येत असल्याचे लक्षात येताच निता आनंद भिल यांनी प्रसंगावधान राखून तेथून पळ काढला. त्यामुळे सुदैवाने त्यांचा जीव वाचला. या घटनेने ऊसतोड मजुरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, वनविभागाने तातडीने पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे, अशी मागणी होत आहे. कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या ऊसतोडीसाठी आलेल्या मजुरांना सोनेवाडी येथील नगदवाडी परिसरात गांगुर्डे यांच्या शेतात राहण्यासाठी जागा देण्यात आली आहे. या परिसरात शेतीची पिके असून, काही भाग ओसाड माळरानाचा आहे. त्यामुळे येथे बिबट्याचा वावर असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**अंधारामुळे मजुरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न** ऊसतोड मजुरांच्या राहण्याच्या ठिकाणी रात्रीच्या वेळी पुरेशा प्रकाशाची व्यवस्था नसल्याचे समोर आले आहे. परिसरात विद्युत खांब असले, तरी वीज उपलब्ध नसल्याने अंधार असतो. अशा परिस्थितीत बिबट्याने थेट मजुरांच्या फडावर हल्ला केल्याने त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. दिवसभर ऊसतोडणी करून थकलेल्या मजुरांना रात्रीच्या वेळी जीव मुठीत धरून राहावे लागत आहे. या घटनेची माहिती वनविभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आली आहे. संबंधित परिसरात तातडीने पिंजरा लावावा, तसेच कारखाना प्रशासनाने मजुरांच्या निवासस्थानी पुरेशा प्रकाशाची व्यवस्था करून त्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी परिसरातून होत आहे. बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे संभाव्य धोका टाळण्यासाठी वनविभागाने तातडीने पावले उचलण्याची गरज आहे.

## कोल्हारमध्ये जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

### २३ जणांविरुद्ध गुन्हा; ३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर, :** राहाता तालुक्यातील कोल्हार येथील बसस्थानक परिसरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर लोणी पोलिसांनी छापा टाकून २३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. सोमवारी (दि. २६) सायंकाळी सुमारे ४.२५ वाजता करण्यात आलेल्या या कारवाईत रोख रक्कम आणि विविध कंपन्यांचे मोबाईल फोन असा एकूण ३ लाख ११ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोल्हार बसस्थानक परिसरात काही जण पैशांची हार-जीत लावून पत्त्यांवर जुगार खेळत असल्याची माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी दिनकर दशरथ काळे (वय ४२, रा. अस्तागाव), लहू लक्ष्मण पवार (वय ३३, रा. कोल्हार), नितीन श्रावण खुडे (वय ५३, रा. पैठण), राहुल राजेंद्र बोरुडे (वय २६, रा. भगवतीपूर), आसिफ युसुफ शेख (वय २७, रा. पाटीलबाबानगर), शेख आसिफ लियाकत (वय ४७, रा. कोल्हार बुद्रुक), शेख शकील सलीम (वय ४०, रा. भगवतीपूर), रमेश दगडू बोरुडे (वय ४५, रा. अंबिकानगर), अंजू बिलाल पिंजारी (वय ३६, रा. पिंजारगल्ली), युवराज देवीदास यशोद (वय ४४, रा. कोल्हार), विजय अगस्तीन वाघमारे (वय ५९, रा. पिंपळस), विशाल राजू शिंदे (वय २६, रा. दुलानीमाता, राहुरी), दिलीप वामन बोरुडे (वय ५२, रा. अंबिकानगर), सय्यद नईम सलीम (वय ३६, रा. भगवतीपूर), सफराज अब्दुल समर शेख (वय २४, रा. भगवतीपूर), बाबासाहेब भाऊसाहेब वडीतके (वय ४८, रा. कोल्हार बुद्रुक), गणेश कुशाबा कोळपे (वय ३०, रा. कोळपेवाडी), दत्तू वसंत थोरात (वय ३६, रा. निंमगावजाळी), विजय मधुकर बोरुडे (वय ३०, रा. कोल्हार बुद्रुक), बाबासाहेब सखाराम मोहिते (वय ६०, रा. कोळपेवाडी), मोहनराज नारायण बोरुडे (वय ४५, रा. कोल्हार बुद्रुक), भारत बारकू रोकडे (वय ४६, रा. दाढ बुद्रुक) आणि अक्षय राजेंद्र शिंदे (वय २४, रा. राजुरी रोड, कोल्हार) यांच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ४ व ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी लोणी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ५३२/२०२६ नोंदविण्यात आला आहे. पोलीस कर्मचारी गणेश आगळगावकर यांनी या कारवाईत सहभाग घेतला. पुढील तपास लोणी पोलीस करीत आहेत.

## वडगाव आनंद शिवारात ऊसाच्या फडात आढळली बिबट्याची ३ गोंडस पिल्ले...!

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वडगाव आनंद :** सध्या ग्रामीण भागात ऊस तोडीचा हंगाम मोठ्या उत्साहात सुरू असून, शिवारात ठिकठिकाणी ऊसाचे फड रिकामे होऊ लागले आहेत. मात्र, याच दाट ऊसाच्या पाचटात बिबट्यांचे निवारेही आता उघड्यावर येऊ लागले आहेत. जुन्नर तालुक्यातील वडगाव आनंद येथील 'पांढर मळा' शिवारात आज (मंगळवारी) दुपारी ३ वाजेच्या सुमारास असाच एक थरारक तरीही भावूक प्रसंग घडला. शेतकरी अजित गोपाळ वाळुंज यांच्या शेतात ऊस तोडणीचे काम जोरात सुरू असताना अचानक बिबट्याची तीन गोंडस पिल्ले निष्पापपणे पडून असलेली दिसून आली.

**ऊस तोडीच्या काळात सतर्कतेचे आवाहन...!**

**हंगामात ऊसाची शेती मोकळी होत असताना बिबट्याचे अधिवास उघडे पडत आहेत. त्यामुळे शेतकरी आणि ऊस तोडणी कामगारांनी कामादरम्यान पूर्ण दक्षता बाळगावी, तसेच पिल्ले आढळल्यास त्यांना हात न लावता तात्काळ वन विभाग किंवा स्थानिक लोकप्रतिनिधींशी संपर्क साधावा, असे आवाहन याप्रसंगी करण्यात आले आहे.**

ऊस तोडणी कामगारांची नजर या पिल्लांवर पडताच त्यांनी तातडीने काम थांबवून शेतकरी अजित वाळुंज यांना कल्पना दिली. घटनेचे गांभीर्य ओळखून माजी उपसरपंच गणेश वाळुंज यांनी लागलीच घटनास्थळी भेट दिली. त्यांनी परिस्थितीची पाहणी करत ऊस तोडणी कामगारांना व उपस्थितांना धीर दिला तसेच वन विभागाशी तात्काळ संपर्क साधून सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक सर्व सहकार्य केले. माहिती मिळताच वनरक्षक डी. यु. साळुंके पिंपरी पेंढार वडगाव आनंद क्षेत्र व त्यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. बिबट्याच्या या चिमुकल्या पिल्लांना कोणताही अपाय होऊ नये यासाठी वन विभागाने तत्काळ ऊस तोडणी स्थगित केली आहे. पिल्लांना सुरक्षितपणे टोपलीत (ट्रेमध्ये)



झाकून ठेवण्यात आले असून, रात्रीच्या वेळी बिबट्याची मादी (आई) या ठिकाणी येऊन आपल्या पिल्लांना सुरक्षित स्थळी घेऊन जाईल, अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

## ठेकेदाराच्या लेखी आश्वासनानंतर देवळाली प्रवरा नगरपरिषदेतील उपोषण मागे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** देवळाली प्रवरा नगरपरिषदेच्या घनकचरा संकलन व वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांच्या वजन नोंदींमध्ये कथित फेरफार होत असल्याच्या आरोपावरून सुरू करण्यात आलेले बेमुदत उपोषण अखेर मागे घेण्यात आले. स्वच्छता ठेकेदार भांड यांनी उपोषणस्थळी झालेली चूक मान्य करून यापुढे अशी चूक होणार नाही, असे लेखी आश्वासन दिल्यानंतर विरोधी नगरसेवक दासू उर्फ तुकाराम पठारे यांच्यासह नगरसेवक संतोष चोळके, शरद वाळुंज आणि सुनीता थोरात यांनी उपोषण मागे घेतले.




देवळाली प्रवरा नगरपरिषद कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर सोमवार, दि. २६ ऑक्टोबरपासून नगरसेवक तुकाराम भिमराज पठारे यांनी बेमुदत उपोषण सुरू केले होते. नगरपरिषदेच्या कचरा संकलन व वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या वजनात कथित फेरफार करून नगरपरिषदेची आर्थिक फसवणूक होत असल्याचा आरोप त्यांनी केला होता. संबंधित ठेकेदाराचे देयक रोखावे, प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी आणि दोषी आढळल्यास ठेकेदाराला काळ्या यादीत टाकावे, अशा प्रमुख मागण्या त्यांनी केल्या होत्या.

उपोषण सुरू असताना स्वच्छता ठेकेदार भांड यांनी उपोषणस्थळी येऊन झालेली चूक मान्य केल्याचे सांगण्यात आले. यापुढे अशी चूक होणार नाही, असे लेखी आश्वासन त्यांनी दिल्यानंतर उपोषणकर्त्यांनी आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे नगरपरिषद कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर सुरू असलेल्या आंदोलनाची सांगता झाली.

यापूर्वी १३ ऑक्टोबर रोजी नगरसेवक तुकाराम पठारे यांनी कचरा वाहतूक करणारे वाहन अडवून चालक व संबंधित कर्मचाऱ्यांकडे विचारपूस केली होती. त्यानंतर त्यांनी नगरपरिषद प्रशासनाकडे लेखी तक्रार दाखल केली होती. वाहनाचे प्रत्यक्ष वजन आणि नोंदवलेले वजन यामध्ये तफावत असल्याचा संशय व्यक्त करत वजनकाट्यावरील पावत्या, वाहनांच्या वजनाच्या नोंदी आणि सीसीटीव्ही फुटेज तपासण्याची मागणी करण्यात आली होती. प्रत्यक्ष संकलित केलेल्या कचऱ्यापेक्षा अधिक वजन दाखवून ठेकेदाराला जादा रक्कम अदा झाली आहे का, याची चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली होती. तसेच, चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली होती. स्वच्छता कराच्या आकारणीवरही प्रश्नचिन्ह

दरम्यान, नगरपरिषद क्षेत्रातील सुमारे ६५०० घरांचा कचरा संकलित केला जात असल्याचे कागदोपत्री दाखवले जात असताना प्रत्यक्षात केवळ सुमारे २००० घरांचाच कचरा उचलला जात असल्याचा आरोप नगरसेवक दासू पठारे यांनी केला होता. ज्या घरांचा कचरा प्रत्यक्षात संकलित केला जातो, त्याच घरांना स्वच्छता कर आकारावा आणि उर्वरित घरांवर कर लादू नये, अशी मागणीही त्यांनी केली होती.

ठेकेदाराने दिलेल्या लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे घेण्यात आले असले, तरी कथित वजन फेरफार प्रकरणाची अधिकृत चौकशी होते का, वजन नोंदींची पडताळणी केली जाते का आणि संबंधित देयकांबाबत प्रशासन काय निर्णय घेते, हे महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे या प्रकरणातील पुढील कार्यवाहीकडे देवळाली प्रवरा शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.